
# महात्मा गांधी

## ...रविंद्रनाथ ठाकूर




अनुवादक

**वासुदेव विश्वनाथ गोखले**



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई



अनुक्रमाणिका

# महात्मा गांधी

रवीन्द्रनाथ ठाकूर

अनुवादक-वासुदेव विश्वनाथ गोखले

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमाणिका

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

**प्रथमावृत्ती :** ९ ऑगस्ट १९८५
© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**मुद्रक :**
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय, २९१, शनवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

**पुनर्मुद्रण :** २०११
© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

**किंमत :** रु. ७६/-

## अनुक्रमाणिका

# मनोगत

साहित्य संस्कृती मंडळाला १९८५ साली २५ वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त महात्मा गांधी यांच्यावर गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांनी बंगालीत वेळोवेळी केलेल्या चिंतनावर आधारित लेखांचे मराठी पुस्तक साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केले. या पुस्तकाला तेव्हा चांगलाच प्रतिसाद मिळाला.

यंदा गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांची १५० वी जयंती देशभर साजरी केली जात आहे. तसेच यंदा राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा सुवर्णमहोत्सव साजारा करण्यात येत आहे. हा सुवर्णकांचन योग जुळून येत असल्याने हे पुस्तक पुन्हा प्रकाशित करीत आहोत.

या पुस्तकामधील गुरूदेवांच्या चिंतनामधून महात्मा गांधी यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलू आणि वैशिष्ट्यांबद्दल आपणांस माहिती मिळते. हा एक वेगळा आणि मनस्वी अनुभव आहे. रविंद्रनाथांसारख्या श्रेष्ठ साहित्यिकांकडून महात्मा गांधींसारख्या श्रेष्ठ व्यक्तीबद्दल व्यक्त झालेले चिंतन हा भारतीय साहित्यसृष्टीचा अमोल ठेवा आहे. तो साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त पुन्हा एकदा मराठी वाचकांसमोर ठेवताना मला अतिशय आनंद होत आहे. या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीप्रमाणेच मराठी वाचक या नव्या आवृत्तीचे मनःपूर्वक स्वागत करतील याची मला खात्री आहे.

**मधु मंगेश कर्णिक,**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.**

अनुक्रमाणिका

# प्रस्तावना

१९८५ हे वर्ष अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे शताब्दी वर्ष आहें. हे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचेही रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचीही २५ वर्षे याच वर्षी पूर्ण होतील. अशा या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या वर्षात टागोरांनी महात्मा गांधींवर बंगालीत जे लिहेले आहे आणि जे मराठीत कधीच आले नाही ते प्रकाशित करण्याचा सुयोग येत आहे.

रवीन्द्रनाथांसारख्या रसिक कविवर्याला गांधीजींबद्दल काय वाटत असेल हे या लहानशा पुस्तिकेतून कळणार असल्यामुळे या पुस्तिकेचे विशेष महत्त्व आहे. ही पुस्तिका १९८५ च्या सुमुहूर्तावर प्रकाशित करण्यात मंडळास विशेष आनंद होत आहे. प्रा. वासुदेव विश्वनाथ गोखले यांचे संस्कृत, पाली, तिबेटन व बंगाली या भाषेवरील प्रभुत्व सर्वश्रुत आहे. त्यांनी माझ्या विनंतीस मान देऊन हे भाषांतर करून दिले हे त्यांचे न फिटणारे ऋण आहे.

**सुरेन्द्र बारलिंगे**

अनुक्रमाणिका

# अनुक्रमाणिका

मनोगत ........ ४

प्रस्तावना ........ ५

अनुवादकाचे निवेदन (१२-२-८४) ........ ७

बंगाली आवृत्तीची प्रस्तावना (१२-२-४८) ........ ८

प्रवेशिका (१९३१) ........ ९

गांधीजी (२-१०-१९३१) ........ १३

अश्विनी चतुर्थी (२०-९-१९३२) ........ १७

महात्माजींचे पवित्र व्रत (२७-९-१९३२) ........ २२

व्रताचे उद्यापन (ऑक्टोबर १९३२) ........ २७

महात्मा गांधी (२-१०-१९३७) ........ ३३

गांधीमहाराज (१३-१२-१९४०) ........ ४०

परिशिष्ट ........ ४१

(पत्रकाराशी मुलाखत) (१९२१) ........ ४१

(नव्या युगातील धर्मयुद्ध) (१९३०) ........ ४२

(मानवी विभूति) (१-१२-१९३०) ........ ४४

महात्माजींचा वाढदिवस (२७-९-१९३२) ........ ४४

गांधींचे मानवी स्वरूप (जानेवारी १९३८) ........ ४६

(थोर संत) (२८-२-१९३१) ........ ४९

("विश्वभारती"—विषयक पत्र) (१९-२-१९४०) ........ ५०

**(कंसात दिलेली शीर्षके मुळात नाहीत, ती नवीन दिलेली आहेत.)**

▪ १ ▪

# अनुवादकाचे निवेदन

(१ फेब्रुवारी १९८४)

माझे विश्वभारतातील जुने स्नेही व प्रस्तुत पुस्तकाच्या मूळ बंगाली आवृत्तीचे प्रकाशक **श्री. पुलिनबिहारी सेन** यांचे सूचनेवरून व तिचेच गुजराथीतील भाषान्तरकार **श्री. बचुभाई शुक्ल** यांचे आग्रहावरून मी हे मराठी भाषान्तर १९४८ सालीच बहुतांशी हातावेगळे करून ठेवले होते. मुंबईच्या **टागोर सोसायटीचे श्री. निर्मल भट्टाचार्य** हेही त्याच्या प्रकाशनात विशेष रस घेत होते. तथापि ऐनवेळी केन्द्र सरकारच्या इच्छेनुसार मला फर्ग्युसन कॉलेजमधून रजा घेऊन तिबेटकडे प्रयाण करावे लागल्यामुळे हे काम जे एकदा मागे पडले ते काही किरकोळ सुधारणा झाल्यानंतर आज **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाकडून** प्रकाशात येत आहे. हा योग केवळ स्वागतार्हच नव्हे तर औचित्यपूर्ण म्हटला पाहिजे!

अनुक्रमणिकेत दाखविल्याप्रमाणे मूळ बंगाली आवृतीत दिलेल्या रवीन्द्रनाथांच्या महात्माजींवरील सात (क्र. ९९) लेखांचे समग्र भाषांतर प्रथम आलेले आहे. परंतु श्री. पुलेनबिहारी सेन यांनी नंतर प्रकाशनाच्या वाटेवर असणाऱ्या इंग्रजी आवृत्तीचीही कच्ची मुद्रिते पाठवून दिली. त्यात मूळ बंगाली आवृतीत नसलेले सहा (क्र. १-६) लेख आढळून आले; तेव्हा त्याचेही भाषांतर करून **'परिशिष्ठा'**त घालण्यात आले. शिवाय, अगदी अलीकडे माझे सन्मित्र श्री. भाऊ धर्माधिकारी यांनी गुजराथी आवृत्तीच्या श्री. शुक्ल यांचे प्रस्तावनेत मिळालेल्या रवीन्द्रनाथांच्या एका पत्राचे रूपान्तर करून दिले, ते परिशिष्ठाच्या सातव्या क्रमाकांवर दिले आहे. मुख्य लेखसंग्रह व परिशिष्ट या दोन्ही विभागातील प्रकरणांचा अनुक्रम शक्यतोवर लेखनकालानुसार ठेवला आहे याचीही नोंद घ्यावी.

३९/१४-१५ प्रभात रोड,
गल्ली क्र. ९, पुणे ४११ ००४.
ता. १२-२-१९४८

**वासुदेव विश्वनाथ गोखले**

* *

अनुक्रमाणिका

# बंगाली आवृत्तीची प्रस्तावना

(१२ फेब्रुवारी १९८४)

महात्माजींसंबंधी रवीन्द्रनाथांनी निरनिराळ्या प्रसंगी जे कथन केले अथवा लिहिले ते त्या त्यावेळच्या पत्रांतून अगर पुस्तकातून निवडून घेऊन या ठिकाणी संकलित केले आहे.

बंगाली सं. १३३८ व १३४४ (इ. स. १९३१ व १९३७) या साली शांतिनिकेतनात महात्माजींच्या जन्मोत्सवप्रसंगी रवीन्द्रनाथांनी जी प्रवचने दिली, तीच "गांधीजी" व "महात्मा गांधी" या प्रबंधाचे मूळ होत.

हिंदूंमधील मागासलेल्या जातींचा एक स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करून हिंदूसमाजाच्या निरनिराळ्या घटकात पडलेली फूट कायद्याने पक्की करून टाकण्याचा प्रयत्न जेव्हा करण्यात आला, त्यावेळी हे अरिष्ट टाळण्याकरता बंगाली संवत् १३३९ (इ. स. १९३२) साली महात्माजींनी प्राणान्तिक उपोषण आरंभिले; या संकटसमयी शान्तिनिकेतनातील आश्रमवासीयांना उद्देशून रवीन्द्रनाथ जे बोलले ते "आश्विनी चतुर्थी" व "महात्माजींचे पवित्र व्रत" या दोन लेखात ग्रथित झाले आहे. महात्माजींच्या उपवासाचे प्रसंगी त्यांचे दर्शन घेण्याच्या उत्कंठेने रवीन्द्रनाथ येरवड्याला गेले होते व त्यांच्या उपवासाचे पारणे फेडण्याला तेथे उपस्थित होते; प्रसंगाचे वर्णन या संकलनातील "व्रताचे उद्यापन" या निबंधात आले आहे.

महात्माजींच्या येत्या वाढदिवशी आनंदोत्सवाचे अर्घ्य म्हणून या पुस्तकाचे प्रकाशन व्हावे अशी मनातील इच्छा, पण राष्ट्राच्या कमनशिबाने अश्रूंचे तर्पण करण्याकरता म्हणून आज हे हाती घ्यावे लागत आहे!

या पुस्तकाच्या विक्रीचे धन महात्माजींच्या स्मारक-निधीस अर्पण होईल.
२९ माघ १३५४ (बंगाली वर्ष)
(१२ फेब्रुवारी १९४८)

***

अनुक्रमाणिका

# प्रवेशिका
(१९३१)

उंच पर्वतशिखरावर निस्तब्ध रात्री एक भक्त ठाण मांडून बसलेला आहे. त्याच्या सभोवतीची सर्व जागा बर्फाने आच्छादलेली असून, आकाशाकडे अनिमिषपणे लागलेले त्याचे नेत्र प्रकाशाचे चिन्ह कोठे दिसते का म्हणून शोध घेत फिरत आहेत. सर्वत्र काळ्याकुट्ट ढगांची दाटी झाली असून, निशाचर पक्षी जेव्हा चीत्कार करून उठत, तेव्हा त्याचे शब्द कानी येत. "बांधव हो, भिऊन जाऊ नका; मानव हा सर्वश्रेष्ठ आहे, ही जाणीव मनात बाळगा!"

त्यांचे ह्याच्याकडे लक्षही नसे. ते आपासात बोलत : "अहो अखेर प्रभावी ठरणार पाशवी सामर्थ्यच. पशू हाच सनातन. माणुसकीची भाषा करणे म्हणजे निव्वळ आत्मवंचनाच नाही तर काय?"

पण मग जेव्हा त्यांना एखादा जबरदस्त तडाखा बसे, तेव्हा ते रडत रडत त्याला हाका मारू लागत आणि म्हणत : "भाईजी, कुठे गेला आहात तुम्ही?" त्यांना लगेच उत्तर येई : "हा मी इथेच तर आहे तुमच्याजवळ!"

अंधारात त्यांना काहीच दिसत नसे. तेव्हा ते आपापसांत तर्क करीत की, "छेः ! आता आपण जे ऐकले तो आपल्याच बावरलेल्या मनःस्थितीतून उत्पन्न झालेला एक आभास असावा. आपले आपण सांत्वन करून घेण्याच्या मार्गाचे ते एक विडंबन म्हणता येईल." आणि मग ते असा निष्कर्ष काढीत की, "मनुष्य प्राणी हा असाच नेहमी मृगजळापाठीमागे धावत राहणार आणि तेसुद्धा हिंसेच्या काटाकुट्यांनी भरलेल्या अशा अफाट वाळवंटामधून!"

X X X

आता ढग निवळले, पूर्वेकडील क्षितिजावर शुक्राची चांदणी दिसू लागली. पृथ्वीच्या वक्षःस्थळातून एक सुटकेचा दीर्घानिःश्वास बाहेर पडला. वृक्षलतांचा मर्मरध्वनी अरण्यातून जाणाऱ्या पायवाटांवरून रुळू लागला. डहाळी-डहाळीतून पक्ष्यांची साद पडू लागली. अशा वेळी भक्ताचे शब्द ऐकू येतात. "चला, वेळ झाली!"

"कसली वेळ?"
"यात्रेला निघण्याची !"

यावर ते सर्वजण बसून विचार करू लागतात. काही अर्थबोध होत नाही. मग ते आपापल्या कल्पनेप्रमाणे अर्थ जुळवीत बसतात.

उषःकालचा स्पर्श जमिनीमध्ये खोलवर रुजू लागला आहे आणि अखिल वस्तुजातीच्या मुळांशी चंचल प्राण स्फुरण पावू लागले आहेत. अशा वेळी कोण जाणे कुठून तरी अगदी सूक्ष्म आवाजात शब्द बाहेर पडून ते कर्णोपकर्णी निनादू लागतात, "आता निघायचे साफल्य-नगराच्या यात्रेला!" झाले, हे शब्द प्रत्येकाच्या तोंडून बाहेर पडू लागतात व त्यांचा एक प्रचंड धबधबा बनून तो वेगाने वाहू लागतो. आता पुरुष उंच माना करून निरखू लागले. स्त्रियांनी मस्तकांवर हात जोडले. मुलामुलींनी हसून टाळ्या वाजविल्या.

प्रभातीच्या कोवळ्या सूर्यकिरणांनी भक्ताच्या भालप्रदेशावर सोनेरी चंदन माखले होते. सर्वांचे तोंडून घोष ऐकू येऊ लागला – "भाईजी ! तुम्हांला आमचे वंदन !"

X X X

दगडांच्या कपारींनी अंथरलेल्या अशा निष्ठुर आणि खडतर मार्गावरून भक्त पावले टाकीत चालला आहे. त्याच्या पाठीमागून सबळ आणि दुर्बल तरुण आणि वृद्ध, पृथ्वीवर राज्य करणारे आणि अर्धपोटी राहून शेतावर राबणारे असे सर्व तऱ्हेचे लोक चालले होते. त्यामध्ये कोणी पायांवर क्षते पडून दमून गेलेले आहेत, तर कोणी मनातल्या मनात चरफडत आहेत; इतर कोणी संशयाने पछाडलेले आहेत. दरेक पावलागणिक त्यांचे विचारणे चालूच आहे– "आता आणिक किती दूर?"

त्यांना उत्तरे देण्याऐवजी भक्त केवळ गाणी गाई. ती ऐकून त्यांच्या कपाळाला आठ्या पडत; तरी पण परत फिरण्याचे त्यांच्या मनात येत नसे. सतत पुढे जाणाऱ्या जनसमुदायाच्या वेगामुळे आणि अंतःकरणातील सुप्त आशेच्या प्रेरणेने ते सारखे पुढेच ढकलले जात होते, त्यांची झोप उडाली होती आणि विश्रान्तीला त्यांनी आपण होऊन फाटा दिला होता. परस्परांना मागे टाकण्याच्या ईर्षेतच ते व्यग्र होते. कारण, कोण जाणे आपण मागे पडलो तर सारेच फसायचे.

दिवसामागून दिवस चालले होते. क्षितिजामागून क्षितिज मावळत होते. अज्ञाताचे आमंत्रण त्यांना अनेकअदृश्य संकेतांच्या साहाय्याने भुलवीत होते. त्याबरोबरच त्यांच्या चेहऱ्यावरील भाव हळूहळू कठोर स्वरूप धारण करू लागले होते व तिरस्काराची छाया अधिकाधिक उग्रतर दिसू लागली होती.

X X X

रात्र पडली होती. यात्रेकरूंनी एक वडाच्या झाडाखाली आपापल्या पथाऱ्या पसरून त्यावर बैकठ मारली. इतक्यात एक वाऱ्याचा झोत येऊन दिवा मालवला गेला. आणि जणू काही निद्रावस्थेतून गाढ मूर्च्छा उत्पन्न व्हावी त्याप्रमाणे सर्वत्र दाट काळोख पसरला.

मंडळींमधून एकजण एकदम उठून उभा राहिला आणि आपल्या पुढाऱ्याकडे अंगुलिनिर्देश करून बोलला– "खोटारडा आहेस तू. आम्हा सर्वांची तू फसवणूक केली आहेस!"

अनुक्रमाणिका

निर्भर्त्सनेचा हा सूर सर्वतोमुखी होऊन वाढत चालला. स्त्रियांनी तीव्र नापसंती व्यक्त केली, तसा पुरुषांच्या घमक्यांनाही जोर चढू लागला. अखेरीस त्यांच्यापैकीच एका माथेफिरूने उठून त्याच्यावर हात टाकला. काळोखात त्याचे तोंड कोणालाच दिसत नव्हते. एकामागून एक उठून त्याच्यावर सारखे प्रहार करू लागले. आणि मग गतप्राण झालेला त्याचा देह तेथे तसाच धुळीत पडून राहिला!

रात्री सगळीकडे सामसूम झाले होते. दूर कोठून तरी वहात्या निर्झराचे मधुर शब्द अस्पष्टपणे कानी पडत होते, व वाऱ्याच्या झुळकेबरोबर जाईजुइचा मंज सुगंध दरवळून येत होता.

X X X

यात्रेकरू भीतीने गांगरून गेले होते. बायका रडू लागल्या की, पुरुष चिडून जाऊन त्यांचे अंगावर ओरडत– "तोंड बंद करा आधी !" कुत्री जोरजोराने भुंकत पण चाबकाचे फटकारे बसले म्हणजे ती केकाटू लागत व अखेर शान्त होत. रात्र कशी ती संपत नव्हती.

घडलेल्या गुन्ह्यासंबंधी एकमेकांवर दोषारोप करणाऱ्या स्त्रीपुरुषांमध्ये वाद निकरावर येऊ लागले. सर्वचजण मोठमोठ्याने ओरडत होते आणि एकमेकांवर गर्जत होते. अखेरीस सुरामारीपर्यंत पाळी येणार की काय असे वाटू लागले. पण तेवढ्यात झुंझुरके दिसू लागले. थोड्याच अवधीत प्रभातकिरणांनी सर्व गिरिशिखरे व्यापून आकाश उजेडाने भरून टाकले.

एकदम सगळेजण स्तब्ध झाले. सूर्यकिरणाची तर्जनी त्या मृत मानवाच्या रक्तलांछित व प्रशान्त अशा भालप्रदेशाला स्पर्श करीत होती !

स्त्रियांनी तर आकान्तच मांडला. पुरुषांनी दोन्ही हातांनी तोंडे झाकून घेतली. काहींना गुचचुपपणे तेथून निघून जावेसे वाटू लागले, पण पाय निघेना; आपणच बळी दिलेल्या त्या प्राण्याशी ते अपराधाच्या श्रृंखलेनें जखडले गेले होते. मग ते आपापसात विचारू लागले,–

"आता आपल्याला वाट दाखवायला आहे कोण ?"

पूर्वेकडील वृद्ध आचार्य मान खाली घालून म्हणाले– "आपण ज्याचा बळी घेतला तोच वाट दाखवील!" सर्वजण निरुत्तर होऊन माना खाली घालून बसले. आचार्य पुढे म्हणाले– "संशयाने पछाडल्यामुळे आपण त्याचे मानले नाही. क्रोधाला बळी पडून आपण त्याची हत्या केली. पण आता आपण प्रेमबळाने त्याचा स्वीकार करू या; कारण तो मृत्यूच्या आधीन होऊन आम्हा सर्वांच्या जीवनात आज जगत आहे. हा खरा मृत्युंजयच आहे !"

सर्वजण उठून उभे राहिले आणि सर्वांच्या तोंडून एका आवाजात गायलेले गीत बाहेर पडले–

अनुक्रमाणिका

"जय मृत्युंजय ! जय !!"

तरुण पिढीचे आव्हान आलें— आता निघूया पण प्रेमनगरच्या यात्रेला शक्तितीर्थाकडे ! हजारो कंठांतून निघणाऱ्या आवाजांचा एक प्रचंड ओघ निर्माण होऊन घोषणा ऐकू येऊ लागल्या— "इहलोकही जिंकू आणि परलोकही जिंकू !" या घोषणांचा अर्थ सर्वांच्या मनात सारखाच असेल असे नाही. उत्साह मात्र सर्वांच्यामध्ये भरपूर होता ! सगळ्यांच्या एकत्रित झालेल्या इच्छाशक्तीच्या प्रवाहापुढे त्यांना मृत्यूचीही पर्वा वाटत नव्हती. मार्ग कोणता हे समजून घेण्याची गरज नव्हती; संशयाला थारा उरला नव्हता; पायांना थकवा माहीत नव्हता. दिवंगत पुढाऱ्याचे आत्मिक बल त्यांचे अन्तर्बाह्य शरीर व्यापून राहिले होते. तो स्वतः मात्र मृत्यूच्या परतीराला पोचला होता आणि संसाराच्या सर्व सीमा त्याने केव्हाच ओलांडल्या होत्या. कधी नुकत्याच पेरण्या झाल्या आहेत अशा शेतांमधून ते चालत असत तर कधी धान्याचा साठा करण्याकरता बांधलेल्या कोठारांवरून त्यांचा मार्ग जात असे. कधी अस्थिपंजर झालेले देह प्राणांची भीक कोण घालील म्हणून वाटेवर पडून आहेत. अशा नापीक जमिनीतून, तर कधी माणसांनी गजबजलेल्या शहरांतील गर्दीमधून वाट काढीत ते चालले होते. कधी अशा उद्ध्वस्त प्रदेशातून की जिथे मूक भूतकाळ आपल्या दिवंगत कीर्तीला मांडीवर घेऊन निस्तब्धतेने बसला आहे, तर कधी निर्धनांच्या जीर्ण झालेल्या वसाहतीमधून की जिथे आश्रय हाच आश्रितांचे विडंबन करीत आहे— ते आपला रस्ता सुधारीत होते.

उन्हाने पोळणाऱ्या वैशाख मासाचे ते दीर्घ प्रहर वाटचाल करता करता संपून जात. संध्याकाळी उन्हाच्या झळा कमी झाल्या म्हणजे ते आपल्या वाटाड्याला विचारीत— "हे जे आपल्याला समोर उंच दिसते आहे तेथेच ना आहे आपले आशास्थान ?' तो म्हणे "छे ! ती आहेत मावळत्या सूर्याची लाल किरणे, अस्ताचलावरील ढगात विलीन पावणारी !"

त्यावर तरुणांची हाक येई— "असे का ? मग बंधुभगिनींनो आता नाही आपल्याला थांबून चालणार. रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारामधून वाट काढीत गेले पाहिजे अमरज्योति दिसू लागेपर्यंत !"

अंधारातून चालले होते ते. अशा तऱ्हेने की जणू काही वाटेलाच माहीत आहे कुठल्या वाटेने जायचे ते ! पायाखालची धूळच जणू काही आपल्या मूक स्पर्शाने वाट दाखवून देत होती ! आकाशमार्गाने जाणाऱ्या नक्षत्रांचे दल जणू काही आपल्या मूक संगीताने आळवीत होती— "साथी, आगे बढो !"

त्यांच्या पुढाऱ्याचे धीर देणारे शब्द अजून त्यांच्या कानात घुमत होते, "आता उशीर नाही !"

***

अनुक्रमाणिका

# गांधीजी

(२ ऑक्टोबर १९३१)

आज महात्मा गांधींचा जन्मदिवस. आपण सर्व आश्रमवासी जन आनंदोत्सवाने साजरा करणार आहो. याप्रसंगी मला फक्त प्रारंभीचा सूर लावून देण्याचे काम करावयाचे आहे.

आजकाल अशा तऱ्हेच्या उत्सवांना पुष्कळसे पारंपरिक स्वरूप प्राप्त झालेले दिसते. थोडी सुट्टीवजा विश्रांती व निरनिराळ्या प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम मिळून असले उत्सव साजरे केले जातात. परंतु अशा तऱ्हेच्या व्यग्रतेत या साऱ्या उपक्रमाचे गंभीर तात्पर्य अंतःकरणावर ठसवून घेण्याची संधी मात्र अनेक वेळा दवडली जाते.

खरे भाग्यशाली पुरुष हे काही केवळ वर्तमानकाळाचेच अधिकारी असत नाहीत. वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांना समजून घ्यावयाचे म्हणजे त्यांना मोठ्याचे लहान करून पहावे लागते; असे करताना दीर्घ कालखंडाकडे नजर ठेवून त्या व्यक्तीचे जे एक शाश्वत स्वरूप आपल्या डोळ्यांना प्रतीत झालेले असते ते आपण संकुचित करून पाहू लागतो. आमच्या तात्पुरत्या दृष्टिकोणातच आमचे लक्ष गुरफटल्यामुळे त्यांचा खरा मोठेपणा दृष्टीआड करून आपण त्यांच्याविषयी आपले मत बनवू पाहतो. याउलट महाकालाच्या विस्तीर्ण पडद्यावर जे एक विशाल व्यक्तिचित्र उमटलेले असते, त्यावरील रोजच्या जीवनात स्वतःचाच विरोध व खंडन करणाऱ्या आणि नेहमीच वाकड्या जाणाऱ्या व अर्धवट तुटलेल्या ज्या रेषा त्या विधता आपल्या हाताने पुसून टाकतो; जे आगंतुक व क्षणभंगुर स्वरूपाचे असेल ते तो लोपवून टाकतो; आणि अशा तऱ्हेने ज्या विभूती आम्हाला वंद्य वाटतात, त्यांची एक संपूर्ण व बांधीव आकाराची मूर्ती संसारात चिरंतन होऊन राहते. जे आम्हाला समकालीन आहेत, त्यांच्याकडेही याच व्यापक दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न करणे यातच आपण त्यांना उद्देशून केलेल्या उत्सवाची सार्थकता आहे.

आजच्या क्षणी भारतवर्षात जो राजकीय संग्राम चालू आहे, तो आणखी दोन दिवसांनी कदाचित दिसणारही नाही; तात्कालिक स्वरूपाची उद्दिष्टेही काळाच्या ओघात कोठच्या कोठे लुप्त होऊन जातील. असे समजू या की, आमची ही राष्ट्रीय साधना उद्या सफळ झाली आणि बाह्यदृष्ट्या तरी मिळवण्याचे असे काही बाकी उरले नाही आणि भारत स्वतंत्र झाला तरी तशा परिस्थितीतसुद्धा आजकालच्या आमच्या इतिहासातील कोणते आत्मप्रकाशाचे किरण सभोवारच्या धुळीच्या वावटळीतून वर डोके काढू शकले, हेच विशेषेकरून आम्हाला पाहावे लागेल. अशा दृष्टीने विचार करू लागलो, म्हणजे ज्यांना उद्देशून आपण आज हा आनंदोत्सव साजरा करीत आहो त्यांचे स्थान कोणते व त्यांचे वैशिष्ट्य कशात आहे हे आपल्याला कळून येईल. केवळ त्यांच्या राजकाराणातील यशस्वितेचे मूल्यमापन करीत बसणे हे कधीच बरोबर होणार नाही, तर ज्या अचाट सामर्थ्याच्या बळावर त्यांनी आज साऱ्या भारतवर्षाला गदगदा हालवून जागे केले, त्या सामर्थ्याच्या मोठेपणा समजून घेण्याचा आज आपण प्रयत्न केला पाहिजे.

ही शक्ती एवढी प्रचंड आहे की सबंध देशाचा ऊर दडपून टाकणाऱ्या अतिशय भारी व अवजड पत्थराला हिने जाग्यावरून हलविले आहे. अगदी थोड्या वर्षांच्या अवधीत भारतवर्षाचे स्वरूप पार बदलून गेले आहे; जणू काही या देशाचा पुनर्जन्म झाल्यासारखे झाले आहे. या महापुरुषाच्या आगमनापूर्वी सारा देश भीतीच्या पांघरुणाखाली पराभूत वृत्तीत लोळत पडला होता; परक्यांची मर्जी सांभाळून काकुळतीने केलेल्या अर्जविनंत्याच काय त्या दृष्टीस पडत असत, आणि आपल्या रोमरोमात औदासीन्याचे दैन्य मात्र वावरत होते.

भारतवर्षाच्या बाहेरून जे अगंतुक म्हणून आले, त्यांच्याच शक्तीचा प्रभाव सगळीकडे पडावा आणि देशाच्या इतिहासपरंपरेत युगानुयुगे वहात आलेला भारतीय जीवनाचा व विचारांचा जो ओघ तोच जणू काही आकस्मिक स्वरूपाचा असल्याप्रमाणे कोरडा पडावा, यापेक्षा आणखी मोठी दुर्गती ती कोणती असू शकेल? आपल्या सेवेने, ज्ञानोपासनेने आणि आत्मीयतेने आपल्या मातृभूमीचे संपूर्ण आकलन करून घेण्याच्या आमच्या प्रयत्नात व्यत्यय आल्यामुळे आम्ही खरोखरीच स्वदेशाला पारखे झाल्यासारखे झालो. राज्यकर्त्यांनी घालून दिलेली शिक्षणपद्धती आणि राज्यव्यवस्था यांच्या पाठीशी त्यांच्याच तलवारी आणि बंदुका असल्यामुळे भारतवर्षात तेच आमचे पुढारी आणि आपण मात्र केवळ त्यांच्या प्रभावळीत शोभणारे— अशा तऱ्हेच्या परिस्थितीला आपण परवापर्यंत मूर्खपणाने मान तुकवीत आलो, आणि आम्ही सारे आळशी आणि मंदबुद्धी बनून राहिलो. देशात ठिकठिकाणी लोकमान्य टिळकांसारख्या काही धैर्यवान पुढाऱ्यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता या आमच्या जडत्वावर जोराचे आघात केले व लोकांमधील आत्मविश्वास जागृत करण्याचे व्रत अंगीकारिले हे खरे; पण हे ध्येय इतक्या प्रखर प्रभावाने आणि पुरेपूर कृतीत उतरविण्याचा प्रयोग केला प्रथम महात्मा गांधींनीच. भरतखंडाच्या जन्मजात प्रतिमेचे वैशिष्ट्य पूर्णपणे जाणून घेऊन, स्वतःच्या असामान्य तपश्चर्येच्या तेजातून त्यांनी एका नव्या युगाची स्थापना करण्यासाठी आपली कंबर कसली. आणि त्यामुळे आमच्या देशात इतक्या दिवसानंतर पुन्हा स्वतंत्र लोकशक्तीचा यथायोग्य व निर्भयपणे अविष्कार होऊ लागला.

इतके दिवस आमच्या भीरुत्वाच्या पायावर गड बांधून परदेशी व्यापाराधिपती साम्राज्यशाहीचा धंदा चालवीत होते. आमच्या नेभळटपणाचा त्यांना आधार मिळाला नसता तर आपली शस्त्रास्त्रे आणि फौजफाटा खडा करण्याकरता त्यांना नीट जागादेखील मिळाली नसती. आपल्या पराभवाचे जे सर्वात बलवत्तर साधन ते आम्ही आमच्या स्वतःतूनच निर्माण केले होते. हा आपला आपण करून घेतलेला जो पराभव त्यापासून आम्हाला मुक्त केले महात्माजींनी; नवचैतन्याच्या अनुभूतीचे पूर त्यांनी भरतखंडात वाहविले : आज आपले राज्यकर्ते आपल्याबरोबर संधी घडवून आणण्याला उद्युक्त झाले आहेत, त्याचे कारण हेच की त्यांच्या परकीय शासनतंत्राचा मूळ पाया जो आमच्यातील नेभळटपणाच्या साहाय्याने घातला गेला होता, तोच आज ढासळून पडला आहे. आपण आज या पृथ्वीवरील मानवसमाजामध्ये आपल्या स्वतःच्या अशा स्थानावर सहज हक्क सांगू शकतो आहो.

म्हणून, आज आपण अशी काळजी घेतली पाहिजे की, जेणेकरून 'यांनी' विलायतेत जाऊन गोलमेजपरिषदेतील वाग्युद्धात भाग घेतला, अथवा यांनी खादीचा आणि चरख्याचाच प्रचार चालू ठेवला, अथवा आधुनिक वैद्यक शास्त्रावर आणि यांत्रिक साधनोपायावर त्यांचा विश्वास आहे, अथवा नाही— वगैरेंसारख्या कार्यपद्धतींच्या व मतमतांतराच्या व्यूहात बंदिस्त करून या महापुरुषाकडे बघण्याचा मोह

आपल्याला होणार नाही. समयानुरूप ज्या ज्या व्यावहरिक योजनांशी त्यांचा संबंध आला, त्यात त्यांच्या चुकाही झाल्या असतील, त्यांचे बाबतीत मतभेदही असू शकतील; पण किती झाले तरी त्या गोष्टी अवांतर स्वरूपाच्या. त्यांनी स्वतःच आपण केलेल्या चुकांची कबुली अनेकवार दिली आहे, आणि बदलत्या काळाबरोबर आपली मतेही पण त्यांना बदलावी लागली आहेत. परंतु ती जी त्यांची अढळ सत्यनिष्ठा की जिच्यामुळे त्यांचे सारे जीवन निश्चल अशा भूमिकेवर आरूढ झाले आहे— तो जो त्यांच्या अजिंक्य दृढनिश्चय, तो त्यांच्या जन्मसिद्ध असल्यासारखा आहे— कर्णाच्या कवचाप्रमाणे सहजात आहे ! अशा तऱ्हेच्या शक्तीचा अविष्कार हा मानवी इतिहासातील एखाद्या चिरस्थायी वैभवाप्रमाणे आहे. आपल्या दैनंदिन गरजांच्या प्रवाही जीवनात बदल हा सारखा चालू राहणारचं, परंतु त्या सगळ्या गरजांना ओलांडून पुढे जाणारा हा जो श्रेष्ठ चारित्र्याचा महिमा आज आपल्यापुढे प्रगट झालेला आहे, त्याच्याबद्दल आदर व श्रद्धा बाळगण्याची सुबुद्धी आम्हाला होवो म्हणजे झाले.

महात्माजींच्या अंगचे हे तेज आज सर्व देशाच्या जीवनात संचारले असून ते आमचे मालिन्य धुवून काढीत आहेत. त्यांची ही तेजःपुंज साधकाची मूर्तीच महाकालाच्या सिंहासनावर कायमची अधिष्ठित झालेली आहे; आपल्या मार्गामध्ये येणाऱ्या आपत्ती-अडचणींची त्यांनी कधी पर्वा केली नाही, स्वतःच्या हातून काही चुका घडल्या म्हणून त्यांना कधी खंत वाटली नाही, क्षणिक उत्साहाच्या भरात असतानाही ते उच्च मनोभूमिकेवर राहून आपली समता ढळू देत नाहीत. अशा तऱ्हेचे प्रबळ चारित्र्य ज्यांच्या अंगी वसत आहे, अशा थोर महात्माजींना आज त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी आपण अभिवादन करूया.

शेवटी मला एक गोष्ट सांगावीशी वाटते ती ही की, पूर्वजांनी जे काही केले, त्याचीच केवळ पुनरावृत्ती करीत राहणे हा काही मानवधर्म नव्हे. इतर जीवजंतू आपल्या जुन्यापुराण्या सवयींच्या कोंडीत बिलगून राहतात; पण मनुष्यप्राणी हा प्रत्येक नव्या युगात नवी सृष्टी निर्माण करून स्वतःला प्रगट करीत असतो. पुरातन संस्कार हे कधीही त्याला एका जागी जखडून ठेवू शकत नाहीत. म्हणून भारतवर्षात युगानुयुगे वावरत असलेली अंधश्रद्धा व मूर्खपणाच्या चालीरीती यांच्याविरुद्ध महात्माजींनी जे बंड एका दिशेने उभारले त्याचा आपण सर्व दिशांनी पुरस्कार करीत राहणे हीच आमची आजची साधना. जोपर्यंत जातिभेद, धर्मविरोध आणि बुद्धिहीन संस्कार यांच्या भोवऱ्यात आपण फिरत राहू, तोपर्यंत, आम्हाला बंधमुक्त करण्याचे काम कोणाला साधू शकेल ? केवळ मतमोजणी व परस्परांच्या हक्कांची काटेकोर छाननी एवढ्या जोरावर कोणत्याही राष्ट्राचा विपन्नावस्थेतून उद्धार होणे शक्य नाही. ज्या राष्ट्राचा सामाजिक पाया अंतःकलह आणि जुलूम जबरदस्तीमुळे भेगा पडून खचून गेला आहे, जे लोक आपल्या पंचांगांच्या रद्दींची बाडे खाकोटीत मारून हिंडतात आणि निर्बुद्धतेमुळे विवेकशून्य झालेल्या वृत्तीने विशिष्ट मुहुर्तावर एखाद्या विशिष्ट तीर्थांत आपल्या वंशपरंपरागत पापाचे क्षालन करण्यासाठी धावत सुटतात, जे आपल्या स्वतःच्या बुद्धिसामार्थ्याचा अपमान करणे यातच आप्तवाक्याचे सारसर्वस्व आहे असे समजून त्याचाच उदोउदो करीत राहतात— असल्या लोकांच्या हातून धीरगंभीर वृत्तीने अशी कोणतीही साधना पार पडणार नाही, की जिच्यामुळे अंतर्बाह्य गुलामगिरीचे पाश तोडून टाकले जातील किंवा जिच्या साहाय्याने स्वातंत्र्याच्या दुस्तर जबाबदाऱ्यांचे शत्रूंपासून संरक्षण चिकाटीने व शौर्याने करण्याची पात्रता अंगी येईल. आपण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की, अंतःस्थ शत्रूंशी झगडण्यातच मनूच्या गुणांची खरी पारख होत असते; बाह्य शत्रूंबरोबर सामना देताना तितक्या मोठ्या शौर्याची गरज असत नाही. आज आपण ज्यांच्याबद्दल भक्तिभाव दाखविण्याकरिता जमलो आहो, त्यांनी या कठीण परीक्षेवर जय मिळवून

दाखवला आहे; अशा तऱ्हेच्या दुष्कर संग्रामात विजयी होण्यासाठी लागणारी जी साधना ती जर आज त्यांच्यापासून या देशाला ग्रहण करता आली नाही, तर आजचीही आमची स्तुतिसुमने आणि समारंभाच्या योजना या साऱ्या व्यर्थ होतील ! आणि आमच्या साधनेला आज कुठे प्रारंभ झाला आहे; काट्याकुट्यांनी भरलेला जो दुर्गम मार्ग, तो अजून पुढेच आहे!

**शांतिनिकेतन**
**१५ आश्विन १३३८**

***

अनुक्रमाणिका

■ ५ ■

# अश्विनी चतुर्थी
(२० सप्टेंबर १९३२)

खग्रास सूर्यग्रहणाचे वेळी दिवसाचा उजेड ज्याप्रमाणे अंधाराने हळूहळू व्याप्त होत जातो त्याप्रमाणे आज मृत्यूची छाया सर्व देशभर पसरत आहे. मात्र भरतखंडाच्या इतिहासात अशा तऱ्हेने सर्वांची अंतःकरणे व्यापून टाकणारी काळजी यापूर्वी देशाला कधी लागली नव्हती, एवढेच काय ते अशा गंभीर शोकप्रसंगीसुद्धा आम्हाला मोठे आशास्थान आहे. देशातील अत्यंत गरीबापर्यंत सर्वांच्याच मनाला याप्रसंगी तीव्र वेदना होत आहेत. ज्यांनी दीर्घकाळापर्यंत आपल्या दुष्कर तपश्चर्येच्या सामर्थ्याने साऱ्या देशाला खरोखरीने आणि अत्यंत तन्मयतेने आपलेसे करून घेतले त्या महात्माजींनी आज आम्हा सर्वांच्या वतीने मृत्यूची दीक्षा ग्रहण केली आहे.

शस्त्रास्त्रे व फौजफाटा जमवून जे लोक मनगटाच्या जोरावर एखाद्या परक्या देशावर वर्चस्व स्थापन करतात त्यांचा प्रताप कितीही दांडगा असला तरी ज्या ठिकाणी त्या देशाचे पंचप्राण वावरत असतात तेथे त्यांना मज्जावच असतो; देशाच्या अंतःकरणाचा सुईच्या अग्रावर राहील एवढाही कण त्यांना आत्मसात करण्याची ताकद असणे शक्य नाही. शस्त्रास्त्रांच्या बळावर आजपर्यंत या भरतखंडावर कित्येक परकीयांनी कित्येक वेळा अधिकार गाजविला आहे; पण आपापले ध्वज त्यांनी जे इथल्या मातीत आणून रोविले होते ते मातीतच कोलमडून त्यांची धूळधाण होऊन गेली.

शस्त्रास्त्रांची काटेरी कुंपणे घालून ज्यांनी परक्यांच्या देशावर स्वतःची सत्ता टिकवून धरण्याची दुष्टबुद्धी मनात बाळगली अशा लोकांना ज्या क्षणी कालचक्राच्या फेऱ्यात सापडून पडद्याआड निघून जावे लागेल. तत्क्षणीच त्यांच्या कीर्तीचे सारे मनोरे भग्न होऊन लाकूडविटांच्या ढिगाऱ्यात अदृश्य होतील. पण ज्यांनी आपल्या सत्यनिष्ठेच्या बळावर विजय संपादन केला त्या महात्म्यांचे ऐश्वर्य त्यांच्या इहलोकीच्या जीवनानंतरही त्यांच्या देशाच्या हृदयमंदिरात विराजमान होऊन राहील यात शंका नाही. आणि या देशाच्या मनःसाम्राज्यावर ज्यांची अशा प्रकारची सत्ता प्रस्थापित झाली आहे, त्या महात्माजींनी आज सर्व देशाच्या वतीने आणखी एका विजयोन्मुख मोहिमेचे प्रस्थान ठेवले आहे आणि ते आपल्या अंतिम बलिदानाच्या मार्गावर आज आहेत. अशा कोणत्या दुस्तर संकटांचे निवारण त्यांना करावयाचे आहे की, ज्याच्याकरिता एवढी मोठी किंमत द्यायला त्यांना दिक्कत वाटत नाही या गोष्टीचा निःस्तब्ध मनाने विचार करण्याचा हा आजचा दिवस आहे.

आमच्या देशात हे एक मोठे भय आहे की, एखाद्या आध्यात्मिक स्वरूपाच्या गोष्टीचीसुद्धा आपण तिला केवळ बाह्योपचारी दक्षिणा देऊन आणि वरवर सन्मान दाखवून बोळवण करू शकतो,— बाह्यचिन्हांनाच महत्त्व देऊन आपण तिच्या आत्मस्वरूपाला कमीपणा आणतो. देशातील पुढाऱ्यांनी आज असा ठराव केला आहे की, सर्व जनतेने आज उपवास पाळावा; यात काही गैर आहे असे मला म्हणावयाचे नाही, पण मन मात्र साशंक होते ते एवढ्याकरिता की, महात्माजींनी आपणे प्राण पणाला लावून जो सत्यसाधनेचा उद्योग प्रारंभिला आहे, त्याच्या शेजारी आमची ही असली अतिक्षुद्र व उथळपणाची कृती ठेवून पाहण्यात आमच्या मनाला उलट अधिकच खंत वाटायची ! आपल्या आजच्या भावनोत्कटतेवर एखाद्या दैनंदिन व मामुली स्वरूपाच्या दुःखाचे

पुसट चिन्ह रेखाटून आपण आपल्या आजच्या कर्तव्यातून मुक्त होण्याचे श्रेय घेतले, अशा तऱ्हेची एखादी केविलवाणी घटना न घडो म्हणजे झाले !

महात्माजी आज उपवासाला बसले आहेत, म्हणून आपणही आज उपवासाचे अनुष्ठान सुरू केले आहे. पण या दोन घटनांची मूर्खपणाने एकमेकांबरोबर तुलना करण्याची बुद्धी कोणालाही न होवो; कारण या दोन गोष्टींत काडीमात्रही साम्य नाही. त्यांचा उपवास म्हणजे काही केवळ अनुष्ठान नव्हे. तो त्यांचा संदेश आहे— अखेरचा शब्द आहे! या त्यांच्या संदेशवाणीची घोषणा साऱ्या भारतवर्षासमक्ष किंबहुना साऱ्या विश्वासमक्ष मृत्यूच्या तोंडून चिरकाल होत राहील. ही संदेशवाणी ग्रहण करणे हे आपले कर्तव्यकर्म आहे असे जर आपल्याला वाटत असेल तर ती यथासांग रीतीने ग्रहणे केली पाहिजे; त्यांच्या तपश्चर्येच्या फळाचा स्वीकार हा आपण स्वतःच्या मनोभावने केलेल्या तपश्चर्येच्या द्वारेच केला पाहिजे.

आज ते आम्हाला जे काय सांगत आहेत त्याचा आपण क्षणभर विचार करून पाहू, मानवी इतिहासाच्या आरंभापासून आतापर्यंत साऱ्या जगात आपल्याला असे आढळून येते की, मनुष्यजातीतील एक वर्ग दुसऱ्या वर्गाला खाली पाडून, त्याला पायाखाली चेपून धरून स्वतःची उन्नती करून घेत आला आहे; एक वर्गाची शक्ती दुसऱ्या वर्गाच्या गुलामगिरीवर आधारलेली असते. आतापर्यंत कित्येक दिवस जरी ही गोष्ट मनुष्यप्राणीच करीत आला असला तरी आपण ती अमानुषच समजली पाहिजे; कारण गुलामगिरीच्या पायावर उभारलेले मानवी ऐश्वर्य नेहमी नश्वरच असावयाचे. हिच्यामुळे फक्त गुलामांचीच अधोगती होते असे नाही तर त्यांच्या धन्यांचाही त्यांचे बरोबरीने अधःपात होतो. आम्ही अपमान करून ज्यांना पायदळी फेकून देतो तेच आमच्यापुढील मार्गक्रमणात धोंड्याप्रमाणे आडवे येतात; आपल्या जडभाराने ते आम्हालाच खाली ओढत राहतात. ज्यांना आम्ही हीन समजतो ते हळूहळू आम्हालाच त्याज्य ठरवितात. मानवांच्या देवाचा असा कायदा आहे की नरभक्षक संस्कृती ही जीर्ण होत जाऊन शेवटी नष्टच झाली पाहिजे. आणि तरीही आपल्या भारतवर्षात आपण ज्यांना साध्या मनुष्योचित आदरालासुद्धा पारखे केले त्यांचा अपमान करून खरोखर साऱ्या भारतवर्षाचा अपमान करीत आलो आहो.

आज भरतखंडात सहस्रावधी लोक तुरुंगात खितपत पडले आहेत आणि त्यांचे पशूं-प्रमाणे हाल व अपमान चालले आहेत— मनुष्यजातीचा हा अपमान देशातील साऱ्या राज्यपद्धतीला कलंक लावीत असून तिला फार मोठ्या संकटांत टाकीत आहे. पण अगदी याचप्रमाणे आपणही आपल्या समाजातील एका मोठ्या वर्गाला अपमानाच्या कोंडवाड्यात बंदिस्त करून टाकले आहे आणि त्यांच्या अधोगतीचा भार वहात असताना आमचे पाऊल पुढे पडणे मुष्किलीचे झाले आहे. कैदखाना काही केवळ कारागृहाच्या भिंती आडचा असतो असे नव्हे; मनुष्याचे हक्क हिरावून घेणे हीही एक प्रकारची कैदच आहे. मानहानीसारखा दुसरा तुरुंग कोणता असू शकेल? आपल्या भरतखंडात आजपर्यंत आपण याच तुरुंगाची वाढ करीत आलो आहोत. या असल्या गुलामांच्या देशात आपल्याला स्वातंत्र्य मिळणार तरी कसे ? —जे दुसऱ्यांना स्वातंत्र्य देऊ शकतात तेच स्वतंत्र होण्यास लायक असू शकतात.

आणि इतके दिवस हे असेच चालले होते; आपण कोणत्या रसातळाला जाऊन पोहोचलो आहो याचा नीट पत्ताही लागला नव्हता आम्हाला. असे असताना एकाएकी भारतवर्षांत स्वातंत्र्यसाधनेच्या जागृतीस प्रारंभ

झाला; आणि आम्ही असा पण केला की परकीय अंमलाखाली आमच्या माणुसकीला लुळीपांगळी बनवून ठेवणारी ही शासन पद्धती आपण यापुढे सहन करणार नाही. पण त्याच वेळी आमच्या विधात्याने आमच्या पराभवाची अंधारी भुयारे कोणत्या ठिकाणी वसत आहेत हेही आमच्या नजरेला आणून दिले आहे.

ज्यांना आपण आजपर्यंत कःपदार्थ लेखीत आलो अशाच लोकामुळे भरतखंडात जे स्वातंत्र्याची उपासना करीत आहेत त्यांच्या साधनेला बाध आला. जे क्षुद्र म्हणून मानले गेले होते, त्यांनीच आज थोरामोठ्यांचे प्रयत्न निष्फळ ठरविले; ज्यांना आपण तुच्छ मानून ठोकरले तेच आता आमच्यावर सर्वांत अधिक तीव्र प्रहार करीत आहेत.

व्यक्तीव्यक्तींमधील सामर्थ्याचे प्रमाण स्वभावातःच कमी अधीक असू शकते. जातीजातीतसुद्धा हा भेद आढळून येतो. उन्नतीच्या मार्गावर असताना सगळेच काही सारखे पुढे जाऊ शकत नाहीत. पण या सबबीवर जेव्हा आपण मागासलेल्या लोकांच्या सभोवती मानभंगाचा कोट बांधून त्यांना पूर्वीच्याच जागी घट्ट जखडून ठेवतो, तेव्हा मात्र आपल्या पापांचे ढीग साचू लागतात, आणि मग मानभंगाचे विष देशाच्या एका अवयवातून सर्वांगांत भिनू लागते. अशाच प्रकारे ज्यांना आपण माणुसकीच्या अभिमानाला पारखे केले, त्यांना आपण गमावून बसलो. यातच आमच्या कमकुवतपणाचे सारे बीज आहे, हेच आमच्या कुंडलीतील शनीचे अष्टमस्थान, आणि याच मर्मस्थानाच्या पायी भारतवर्षाला आजपर्यंत वारंवार पराभव खाऊन मान खाली घालावी लागली आहे. आपल्या तटांचे बांधकाम इतके पोकळ झाले आहे की, जरा धक्का लागताच ते ढासळून पडू लागते. काळाच्या ओघानेच जे भेद आपोआप नष्ट झाले असते, ते आम्ही अगदी प्रयत्नपूर्वक, सामाजिक रूढींचा हवाला देऊन पक्के करून टाकले आहेत. आमची राजकीय स्वातंत्र्यसाधना केवळ या भेदबुद्धीच्या शापामुळे आज निष्फळ होऊ पहात आहे.

ज्या ठिकाणी एखाद्या विशिष्ट वर्गाच्या अपमानाचे पायावर दुसऱ्या एखाद्या वर्गाच्या सन्मानाची उभारणी होते, त्या ठिकाणी समतोलपणा नाहीसा झाल्यामुळे अनेक आपत्ती ओढवतात; यावरून हेच सिद्ध होते की, समता हाच मानवी जीवनाचा आधारभूत धर्म आहे. युरोपातील राष्ट्रातून दुसरे कोणते भेद नसले तरी पंक्तिभेद हा आहेच. त्यांच्यातील पंक्तिप्रपंचामुळे मानमरातब आणि संपत्ती यांची वाटणी सारखी होत नाही. आणि म्हणूनच तिकडे श्रीमंत आणि श्रमजीवी वर्ग यांच्यातील विषमता जसजशी वाढत आहे तसतसा तेथील समाजाचा पाया डळमळू लागला आहे. या विषमतेच्या भाराने तेथील समाजव्यवस्था दिवसेंदिवस खालावत आहे– जर काही सोप्या उपायाने समतेची स्थापना झाली तरच सुटका, नाही तर सध्याची स्थिती निस्तरणे त्यांना कठीण आहे. जिथे जिथे म्हणून एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याचा छळ करतो, तिथेतिथे त्याच्या माणुसकीवर आघात हा झालाच पाहिजे. आणि तो आघात त्याला मृत्यूच्याच दिशेने घेऊन जाईल.

आपल्या समाजाच्या अंतरंगात वास करणारी ही जी विषमता, जी मानहानि तिच्याकडे महात्माजींनी कित्येक दिवसांपासून आपले लक्ष वेधून ठेवले आहे; तरीही जरूर तेवढ्या तत्परतेने या दिशेने सुधारणा घडवून आणण्याकडे आमची प्रवृत्ती झालेली नाही. चरखा व खादी यांच्या बाबतीत आम्ही जितकी आस्था दाखविली, आर्थिक दुरावस्थेकडे आमचे जितके लक्ष आहे, तितके ते सामाजिक अधोगतीकडे नाही. म्हणूनच आज हा दुःखाचा दिवस उगवला आहे ! आपली आर्थिक आपत्ती ही पुष्कळ अंशी बाहेरून आयात केल्यासारखी आहे.

अनुक्रमाणिका

तिला डावलणे ही काही अत्यंत दुःसाध्य अशी गोष्ट नाही. परंतु आमच्या ज्या सामाजिक पापांचा आमच्या शत्रूंना मोठा आधार आहे, त्यांचे उन्मूलन करणे म्हणजे आमच्या अगदी जिवावरची गोष्ट झाली आहे ! त्यांच्याबद्दल आम्हाला केवढी माया ! याच पोसलेल्या पापांविरुद्ध आज महात्माजींनी अंतिम युद्धाची घोषणा केली आहे. आपले नशीब तितकेच खडतर असेल, तर या रणकुंडात त्यांच्या देहाची आहुतीही पडू शकेल. पण मग जाताना मात्र ते या युद्धाचा भार आमच्यापैकी प्रत्येक व्यक्तीच्या शिरावर सोपवून जातील. तेव्हा आजच जर आपण त्यांच्या हातून हे दान अंतःकरणपूर्वक ग्रहण करू शकलो तरच आजच्या या दिवसाचे सार्थक होईल. एवढी प्रचंड हाक ऐकूनही, जे केवळ एक दिवसाच्या उपासानंतर दुसऱ्या दिवसापासून पुन्हा पूर्वीसारखेच कोरडे ठणठणीत रहातील, त्यांच्याकरिता मात्र दुःखामागून दुःखे आणि दुष्काळामागून दुष्काळ हे वाढून ठेवलेलेच आहेत. म्हणून असल्या क्षुल्लक देहदंडाने खऱ्या सत्यसाधनेचा अपमान आमच्या हातून घडला नाही म्हणजे मिळविली !

महात्माजींनी ग्रहण केलेल्या या व्रताचा परिणाम आमच्या राज्यकर्त्यांच्या संकल्पित योजनांवर किती व कसा होईल हे मला माहीत नाही, व त्यासंबंधी राजनैतिक चर्चा करीत बसण्याचा हा दिवसही नव्हे. पण एकच गोष्ट सांगण्यासारखी वाटते ती सांगतो. आज असे दिसते की, महात्माजींनी जे या अंतिम उपायाचे अवलंबन केलेले आहे, त्याचा अर्थ इंग्रजांमधील बहुजनसमाजाला समजणे शक्य नाही ! आणि तो न समजण्याला कारणही आहे, ते असे की, महात्माजींची भाषा निराळी व इंग्रजांना समजणारी भाषा निराळी. आमच्या समाजातील आत्मघातकी भेदभावाविरुद्ध हा जो महात्माजींचा जिवापाड प्रयत्न चालू आहे, तो त्यांच्या सध्याच्या कार्यपद्धतीशी जुळत नाही, म्हणून तर त्यांना हा प्रकार विस्मयजनक वाटतो. तरीही त्यांना या प्रसंगी मी एका गोष्टीचे स्मरण करून देऊ शकतो— आयर्लंड जेव्हा ब्रिटिशांचा संबंध तोडून टाकून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत होते, त्यावेळी किती उद्वेगजनक घटना घडून आल्या ! किती रक्तपात झाला, किती अमानुष क्रौर्य दाखविले गेले ! राजकारणात या हिंसात्मक पद्धतीचाच उपयोग करण्याची संवय पाश्चिमात्य राष्ट्रांना लागली असल्यामुळे, आयर्लंडांतील राजकारणाची ही रक्तलांछित प्रतिमा पाहून कोणालाच,— निदान बहुजनसमाजाला तरी, (दुसरे काही वाटले असले तरी) विचित्र असे काही वाटले नाही. पण महात्माजींच्या या अहिंसामय आणि स्वार्थनिरपेक्ष प्रयत्नांचे शांत स्वरूप पाहून मात्र ते बुचकळ्यांत पडतात. 'महात्माजींना भारतवर्षातील दलित वर्गाबद्दल काहीच आपुलकी वाटत नाही', अशा तऱ्हेच्या अत्यंत अन्यायमूलक विचारसरणीला आज थारा मिळू शकतो, याचे कारण इतकेच, की या त्यांच्या चळवळीमुळे आमच्या सम्राटाच्या सिंहासनावर आज संकटपरंपरा ओढवली आहे; आमच्या राज्यकर्त्यांची मने भांबावून गेली आहेत, म्हणूनच त्यांना असल्या काल्पनिक कथा सुचताहेत. त्यांना ही गोष्ट अजून समजू शकत नाही, की राजकीय तरवारीच्या धारेवर हिंदु समाजाचे दोन तुकडे पडलेले पहावे लागणे, ही आपत्ती हिंदूंना मृत्यूपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी भयंकर वाटणार नाही. समजा, एखाद्या वेळी एखाद्या तिऱ्हाइताने बाहेरून येऊन इंग्लांडांतील प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक या दोन पंथांना अशाच रीतीने एकमेकांपासून अगदी पूर्णपणे विभक्त करून टाकले असते, तर त्या देशात एखादे हत्याकांड सुरु झाल्याशिवाय राहिले असते काय ? आमच्या देशात हिंदुसमाजावर ओढवलेल्या या महासंकटकाळी महात्माजींच्या हातून तसल्याच एखाद्या प्राणसंहारक युद्धाचे परिवर्तन एका वेगळ्याच स्वरूपात अवतरत आहे, इतकेच काय ते. प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक यांचेमध्ये अनेक दिवसांपासून जे अधिकारभेद प्रचलित होते, त्यांचा तेथील समाजाने आपण होऊनच आज निकाल लावला आहे; त्याकरिता

अनुक्रमाणिका

त्यांनी काही तुर्कस्थानच्या बादशाहाला आमंत्रण दिले नाही. तसेच आमच्या देशातील सामाजिक कूटप्रश्न सोडविण्याची जबाबदारीही आमच्यावरच पडायला हवी.

राजकारणात ज्या अहिंसा-नीतीचा महात्माजींने इतके दिवस प्रचार केला, त्याच नीतीचा पाठपुरावा ते आज स्वतःचे प्राण देऊन करायला प्रवृत्त झाले आहेत, ही गोष्ट समजालया इतकी काही अत्यंत कठीण आहे, असे मला वाटत नाही.

**शांतिनिकेतन**
**बंगाली वर्ष, ४ आश्विन १३३९**

***

अनुक्रमाणिका

▪ ६ ▪

# महात्माजींचे पवित्र व्रत

(२७ सप्टेंबर १९३२)

अनेक युगातून कधीतरी दैवयोगाने या जगात महापुरुषांचे आगमन होत असते. नेहमीच त्यांचे दर्शन आपल्याला घडते असे नाही; पण जेव्हा घडेते तो दिवस महान भाग्याचा समजला पाहिजे. आजकालच्या जगात दुःखाला पारावार नाही; कायकाय जुलूम, केवढे दैन्य, किती तऱ्हतऱ्हेच्या व्याधी, शोकप्रसंग आणि आपत्ती आपल्याला सदोदित सहन कराव्या लागत आहेत; दुःखाचे डोंगर सारखे वाढतच आहेत. तथापि, या साऱ्या दुःखाला पाठीमागे टाकणारे असे एकच एक सुख आपल्याला आज लाभले आहे; ते हे की, ज्या पृथ्वीवर आपण आज आपले जीवन कंठीत आहो व व्यवहार करीत आहो, त्याच पृथ्वीवर भारतवर्षांत आज एका असामान्य महापुरुषाचा अवतार झाला आहे !

महापुरुष ज्यावेळी जन्माला येतात, त्यावेळी आपण त्यांना नीटपणे ओळखू शकत नाही; कारण सामान्यतः आमच्या मनोवृत्ती घाबरट व गढूळ, आमचे स्वभाव नेभळट आणि आमच्या संवयी कमकुवत अशा बनून राहिलेल्या आढळतात, मनामध्ये तसे सामर्थ्य नसते की, ज्याच्या योगाने मोठेपणा म्हणजे कसा असतो ते संपूर्णपणे जाणून घेऊन त्याचे ग्रहण करता येईल. वारंवार हीच गोष्ट आजपर्यंत घडत आली आहे की, जे सर्वांहून मोठे त्यांना आपण सर्वांहून दूर अन्तरावर राखीत आलो आहो.

ज्ञानी, गुणवान आणि कठोर तप आचरणारे जे पुरुष त्यांची ओळख पटणे सोपे नाही, कारण आमचे स्वतःचे ज्ञान, बुद्धीसामर्थ्य आणि संस्कार या सर्वांचा त्यांच्यापुढे काहीच पाड लागत नाही. पण त्यांची एक गोष्ट मात्र समजायला तितकीशी कठीण नसते, ती म्हणजे प्रेम. जे महापुरुष प्रेमाच्या द्वारे इतरांना स्वतःचा परिचय करून देतात, यांना आमच्यामधील प्रेमामुळे आम्ही काही अंशी जाणू शकतो. म्हणून तर भारत वर्षांत आज ही आश्चर्यकारक घटना घडून आली की, आपण एका महापुरुषाला ओळखू शकलो. एरव्ही अशी गोष्ट काही सहसा घडून येत नाही. आज ज्या विभूतीने आमच्यामध्ये जन्म घेतला आहे ती अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत महान् अशी आहे; तरीही आम्ही तिचा स्वीकार करू शकलो आहो व तिची ओळख आम्हाला पटली आहे. आज सर्वांना ते आपले असल्यासारखे वाटतात. त्यांच्या प्रेमापुढे उच्च व नीच, शहाणा व मूर्ख, श्रीमंत व गरीब हे भेद सारे मावळून गेले आहेत. त्यांच्या प्रेमाचा वर्षाव सर्वांवर सारखा होत असतो. ते सर्वांचेच कल्याण, सर्वांचेच मंगल इच्छितात, आणि ही इच्छा ते नुसत्या शब्दात बोलून दाखवीत नाहीत, तर आपल्या अंतःकरणातील दुःखावेगांनी भरलेल्या भाषेत. त्यांनी किती पीडा व अपमान सहन केले आहेत; त्यांचा साराच जीवनवृत्तांत दुःखदायक प्रसंगांनी व्यापलेला आहे. केवळ भारतवर्षातच त्यांना दुःख व मानहानी भोगावी लागली असे नाही, तर दक्षिण आफ्रिकेत त्यांना कितीतरी मारपीट सहन करावी लागून मरणोन्मुख होऊन पडावे लागले होते. ते दुःखे सोसतात ते विषयसुखाच्या आशेने नव्हे, किंवा स्वार्थासाठी नव्हे तर सर्वांचे भले व्हावे म्हणून. इतक्यांदा प्रहार झाले असतील त्यांच्यावर, पण ते कधी कोणाला उलटून बोलले नाहीत की कोणावर रागावले नाहीत. सारे वार त्यांनी केवळ आपल्या डोक्यावर न डगमगता झेलले, आणि त्यांच्या शत्रूंनाही त्यांचे धैर्य व मोठेपणा पाहून तोंडात बोटे घालावी लागली. त्यांचे सारे संकल्प सिद्धीला गेले, पण ते मनगटाच्या जोरावर मात्र नव्हे;

त्यागाच्या, सहनशक्तीच्या, तपश्चर्येच्या जोरावर त्यांनी विजयश्री प्राप्त करून घेतली. अशा तऱ्हेची ही विभूति भारतीयांच्या दुःखाचा डोंगर जणू काय स्वतःवर ओढवून घेतलेल्या दुःखाच्या आवेगाने ढकलून देण्याकरिताच अवतीर्ण झाली आहे.

तुम्हा सर्वांनी त्यांना कधी प्रत्यक्ष पाहिले आहे की नाही माहीत नाही.— काही काहींना कदाचित त्यांच्या दर्शानाचा लाभ घडलाही असेल— तथापि त्यांची माहिती तुम्हा सर्वांना आहे, किंबहुना साऱ्या भरतखंडाला आहे. सर्वांना ठाऊक आहे, त्यांच्यावरील आपली भक्ती साऱ्या भरतखंडाने कोणत्या तऱ्हेने प्रकट केली आहे ती. त्यांनी एक पदवी दिली आहे त्यांना— 'महात्मा' म्हणून. लोकांना त्यांची ओळख कशी पटली ही खरोखरीच एक आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. कारण एरव्ही जरी पुष्कळ लोकांना महात्मा म्हटले जाते व त्यात फारसा अर्थ असतोच असे नाही, तरी या महापुरुषाला 'महात्मा' म्हणून संबोधण्यात नितान्त अर्थ आहे. ज्याचा आत्मा महान असेल तोच 'महात्मा' होऊ शकतो. ज्यांचे आत्मे क्षुद्र विषयसुखात गुरफटलेले, ज्यांची मने पैसाआडका, घरदार यांच्या चिंतेतच मग्न, ते दीनात्मे. त्यांचे उलट, सगळ्यांची सुखदुःखे ज्याने आपली म्हणून मानली, सगळ्यांचे हित ते स्वतःचे हित म्हणून मानले, तोच खरा महात्मा ! कारण, सर्वांच्या हृदयात त्याला स्थान असते व सर्वजण त्याच्या हृदयात वास करतात. आमच्या शास्त्रात परमेश्वराला म्हटले आहे महात्मा. अशा तऱ्हेचे दिव्य प्रेम व प्रेमाचे ऐश्वर्य या मर्त्यलोकात केवळ दैवयोगानेच पाहावयास मिळते. हे प्रेम आज ज्यांच्यामध्ये व्यक्त झालेले आहे, त्यांच्याबद्दल सारासार विचार करून एवढे तरी आपल्याला आज कळून चुकले आहे की, त्यांचे सर्वांवर अगदी अंतःकरणापासून प्रेम आहे. पण संपूर्णपणे त्यांना आपण अजूनही ओळखू शकलो नाही. तसे करण्याच्या आड जी एक गोष्ट येते आहे ती म्हणजे आमच्या मनाचा आडमुठेपणा. सत्याचा सरळ स्वीकार करायला आपण कचरतो. आमच्या मनात शंकाकुशंका उद्‌भवतात. कष्ट न पडता जे सहजा सहजी मानता येण्यासारखे असेल तेवढेच आपण मानतो; गोष्ट समजायला जरा कठीण दिसली की ती सारलीच बाजूला ! याकरताच त्यांच्यामधील सर्वश्रेष्ठ सत्याचा स्वीकार आपल्याकडून होऊ शकलेला नाही. यातच आम्ही त्याचे खंडण केल्याप्रमाणे आहे. महात्माजी जसे आपणांमध्ये आज आले, तसे ते उद्या निघूनही जातील; आणि कदाचित शेवटपर्यंत त्यांचा संदेश आपण ग्रहण करूही शकणार नाही.

ख्रिस्ती धर्मग्रंथात आपण वाचतो की, आचारनिष्ठ यहुद्यांनी येशू ख्रिस्ताची शत्रू म्हणून हत्या केली. पण हत्या ही केवळ शरीराचीच तेवढी असू शकते काय ? स्वतःचे प्राण पणाला लावून मनुष्यकल्याणाचा मार्ग खुला करण्यासाठी जे अवतरले, त्यांच्या त्या मार्गात विघ्ने उपस्थित करणे म्हणजे ही एक प्रकारची हत्याच नव्हे काय? किंबहुना, हीच सर्वात मोठी हत्या समजली पाहिजे. किती असह्य वेदना सहन करून आज महात्माजींनी मृत्यूच्या व्रताची दीक्षा घेतली आहे ! त्या व्रताचा जर आमच्याकडून आज स्वीकार नाही झाला, तर ती त्यांची आम्ही हत्या केल्याप्रमाणेच होणार नाही काय ? आमच्या क्षुद्र मनालासुद्धा आपल्या संकुचितपणाची, भ्याडपणाची लाज वाटल्यावाचून कशी राहिल ? त्यांच्या त्या दुःखवेदनांचा अनुभव आम्हाला आपल्या गूढ अंतःकरणाच्याद्वारे करून घेता येणार नाही का ? त्यांनी दिलेले दान नुसते ग्रहण करण्याची शक्तीही आमच्यात उरलेली नाही ?— इतके का आपण संकुचित वृत्तीचे आणि भ्याड बनलो आहोत ? त्यांच्या हृदयात तर असल्या भ्याडपणाचा मागमूसही सापडत नाही. त्यांच्या धैर्याला पारावार नाही, मृत्यूला त्यांनी क्षुद्र मानले; कारागृहा तील सक्तमजुरी व लोखंडी बेड्या त्यांच्या इच्छाशक्तीच्या आड येऊ शकल्या नाहीत ! अशा प्रकारचा हा महात्मा आज अवतरला आहे आमच्यामध्ये. जर का आपण घाबरटपणाने पाठीमागे राहिलो तर

आम्हाला आज शरमेमुळे कोणाला तोंड दाखवायची सोय उरणार नाही. आज त्यांनी जे मृत्यूचे व्रत स्वीकारिले आहे, ते लहानापासून थोरापर्यंत सर्वांचे ऐक्य घडवून आणण्याकरिता. त्यांच्या या अफाट साहसाचे आणि शक्तीचे प्रतिबिंब आज तरी आमच्या बुद्धीत आणि कार्यात पडू दे. आज आपण या महात्म्याचे मुक्तकंठाने आवाहन करून त्याला सांगू या, की 'जाऊ नकोस तू, ही पाहा आम्ही याक्षणी तुझ्या व्रताची दीक्षा घेतली !'— जर ता हे आपणांकडून घडले नाही, आणि एवढ्या सामर्थ्यवान चारित्र्याला जर आपण कुचकामाचे ठरविले, तर त्यापेक्षा अधिक भयंकर अशी आपत्ती तरी कोणती ?

आपण तीच तीच गोष्ट सारखी बोलत राहतो की, परदेशातील लोक आपला शत्रूप्रमाणे द्वेष करतात; पण खरे म्हटल्यास त्यांच्याहीपेक्षा बलाढ्य असा एक शत्रू आमच्या स्वतःच्या हाडीमाशी खिळून राहिलेला आहे. तो म्हणजे आमचा स्वतःचा भ्याडपणा. या भ्याडपणावर इलाज करण्याकरिताच जणू काही आमच्या विधात्याने महात्माजींच्या रूपाने आमच्याकडे एक अस्त्र धाडून दिले आहे. स्वतःला अभय घेऊन ते आमची भीती हरण करण्यासाठी आले आहेत. हे त्यांनी दिलेले दान काय त्यांना आपण सरळ परत करणार आहोत ? केवळ पंचा गुंडाळून घेऊन हा मनुष्य आमची दारे ठोठावीत फिरत आहे आणि आम्हाला धोका कोणत्या दिशेकडून आहे ते बजावून सावध करीत आहे. मनुष्यच जेथे मनुष्याचा अपमान करीत राहतो, त्या ठिकाणाहून परमेश्वर पाठ फिरवून परत जातो. आज शतकानुशतके माणुसकीच्या अपमानाचे हे विष भारतीयांच्या नसासनांतून वाहत आलेले आपण पाहत आहो. हीनपणाचा असह्य बोजा आपण शेकडो लोकांच्या वाकलेल्या मानेवर चेपून देत आलो आहो. याच भाराने आज सारा देश थकून दुर्बळ झाला आहे. याच पापामुळे आज आम्ही सरळ उभेसुद्धा राहू शकत नाही. आमच्या नेहमीच्या मार्गावर आपण पावलो-पावली चिखलाची डबकी तयार करून ठेवली आहेत. त्यांच्यातच आमचे बहुतेक मांगल्य आज डुबून चालले आहे. भावाने भावाच्याच तोंडाला आपल्या हाताने डांबर फासावे— हा असला अत्याचार सहन करणे महात्माजींना यापुढे शक्य नव्हते !

आपले मन संपूर्णपणे एकाग्र करून आज आपण त्यांचा संदेश ऐका; त्यांची इच्छाशक्ती केवढी प्रचंड आहे याचा अनुभव घ्या. आज हा तपस्वी उपोषणास बसला आहे. दिवसांपाठीमागून दिवस जात आहेत त्यांनी अन्न न ग्रहण करता; तर त्यांना आज आपण अन्नदान करू शकत नाही काय ? त्यांचा आदेश पाळणे हेच त्यांना अन्नाप्रमाणे आहे; ते देऊन आपण त्यांना वाचवायला हवे. आजपर्यंत अनेक अपराध आमच्याकडून घडले, पापांच्या राशी रचून ठेवल्या. आपल्या भावाला आपण वागविले एखाद्या गुलामाप्रमाणे,— पशूप्रमाणे; याच अपमानामुळे आम्ही साऱ्या जगाच्या दृष्टीने हीन बनलो आहोत. ज्याचा जो योग्य तो मान जर आपण ठेवला असता तर आमची आज अशी दुरावस्था झाली नसती. पृथ्वीवरील इतर साऱ्या समाजांबद्दल लोकांच्या मनात आदर असतो, भय असते; कारण ते परस्परांशी ऐक्य भावनेने बांधलेले आहेत. पण आपल्या हिंदुसमाजावर आघात करण्याला, त्याचा अपमान करण्याला आज कोणालाच दिक्कत वाटत नाही; ही गोष्ट वारंवार प्रत्ययाला आलेली आहे. आपल्याशी ही मुजोरी ते लोक कशाच्या जोरावर करतात हे आपल्याला खरोखर एक क्षणभरही विसरून चालणार नाही.

जितका आदर महात्माजी आम्हा सर्वांबद्दल दाखवू पाहतात, तितकाच आदर आपण इतर सर्वांबद्दल दाखविला पाहिजे; ज्यांना हे साधारण नाही ते कुचकामाचे ठरतील ! भावाला भाऊ म्हणून स्वीकारताना जेथे प्रतिबंध होतो, असल्या सडलेल्या समाजाला घेऊन काय करावयाचे आहे ? सर्वांत मोठा भ्याडपणा जर कोणता

असेल तर तो हाच की सत्याची जाणीव होऊनही आपण ते सत्य मानू शकत नाही; असल्या भ्याडपणाला या जगात क्षमा करणे शक्य नाही !

आपल्या देशाला हा शाप कित्येक दिवसापासून लागून राहिला आहे. त्याचे प्रायश्चित घ्यायला आज जे महात्माजी बसले आहेत, त्यांना त्या कार्यात आपल्याला जोड देणेच प्राप्त आहे. अशा प्रकारच्या सहकार्यात आमच्या कायमच्या ऐक्याचा प्रारंभ होऊ शकेल. मृत्यूच्या पात्रात आपल्या प्रायश्चित्ताचे उदक सोडून त्यांनी ते आम्हासमोर धरले आहे,— अगदी पुढे करून आमच्या हातापर्यंत पोहोचविले आहे. आपण सर्वजण त्याचे ग्रहण करून आपले पापक्षालन करूया; यातच सर्वांचे कल्याण आहे. त्यांचा शेवटचा संदेश तुम्हाला निवेदन करण्याकरताच आज मी येथे आलो आहे. ते आमच्यापासून दूर अंतरावर असूनही ते आम्हाला खरोखरच दूर नाहीत, कारण आमच्या अंतःकरणात ते अधिष्ठित झालेले आहेत. जर का त्यांना आज आमच्याखातर प्राणार्पण करणे भाग पडले, तर मात्र पारावार उरणार नाही आमच्या पश्चात्तापाला.

आपल्याला मान खाली घालावी लागेल. एका दुर्धर व कष्टदायक व्रताचा अंगीकार करावयास ते आम्हाला सांगत आहेत हे खरे, पण त्याच्याहीपेक्षा दुःसह कार्य त्यांनी स्वतः करून दाखविले आहे; त्यांचे स्वतःचे व्रत त्याच्याहीपेक्षा दुर्धर आहे. त्यांनी दिलेले व्रत स्वीकारण्याचे धैर्य मात्र आम्हाला प्राप्त होवो म्हणजे झाले. आम्हाला ज्या गोष्टीचे एवढे भय वाटते ती तर मुळी अस्तित्वातच कोठे आहे ? ती तर सारी खोटी माया ! सत्याचा अंशही तिच्यात नाही. तिला कशाकरिता एवढे भ्यायचे ? आज आपण सर्वजण मिळून निश्चय करू या की, आम्ही असत्याला यापुढे थारा देणार नाही. बोला, आज अगदी मनापासून शब्द येऊद्यात; आता भय राहिले आहे कोणाचे ? सारे भय हरण करूनच आज महात्माजींनी अनुष्ठान सुरू केले आहे. प्रत्यक्ष मृत्यूचे भय त्यांनी जिंकल्यामुळे, आता आमच्याकरिता दुसरे कसलेच भय शिल्लक उरले नाही. लोकभय, राजभय, समाजभय— यापैकी कोणत्याच भयाने आम्हाला दबून जाण्याचे कारण नाही. आज आपण त्यांच्याच मार्गाने त्याच्याच मागोमाग जाऊ व त्यांचा पराभव होऊ देणार नाही ! साऱ्या जगाचे डोळे आज आपल्याकडे लागले आहेत. अर्थात् काही सहानुभूतिशून्य लोक आपला उपहासही करीत आहेत. आणि अशा गंभीर प्रसंगीसुद्धा जर आपण कोरडे ठणठणीतच राहिलो तर तो एक उपहासाचाच विषय होईल यात आश्चर्य कसले ? पण जर का आज त्यांच्या शक्तीतून उडालेल्या ठिणगीपासून आमच्या अंतःकरणात ज्वाला पेटल्या आणि आपण सर्वजण एका आवाजाने त्यांना म्हणू शकलो की, 'हे तपस्वी, तुमचा जय असो; तुमच्या तपश्चर्येचे सार्थक होवो', तर सारे जग विस्मित होईल; तो आमचा जयघोष समुद्राच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचेल व सारी दुनिया बोलेल की, 'सत्याची वाणी अमोघ आहे; धन्य असो त्या भारतवर्षाची !' या आजच्या प्रसंगी एवढ्या प्रचंड सिद्धीच्या मार्गात जो आडवा येईल त्यांची मात्र कीव करावी तितकी थोडीच आहे. आणि तुम्ही जर केवळ भीतीने अशा माणसाचा आदर करू लागला त्याच्याहीपेक्षा अधिक तुमची कीव करावी लागेल.

जो तपस्वी आज या मुहूर्ताला आपल्यासमोर मृत्यूला खडा करून, स्वतःच्या हृदयात भगवंताला अधिष्ठान देऊन, आपल्या अंतःकरणांतील प्रेमाची ज्योत पाजळीत बसला आहे त्याचा विजय असो ! तुम्ही त्याचा जयघोष करा आणि तुमच्या कंठांतून निघालेला ध्वनी त्याच्या त्या दूरच्या आसनापर्यंत पोहोचू दे; म्हणा की, "हा पहा, आज आम्ही तुझा अंगीकार करून तुझ्या सत्यापुढे ही मान वाकविली !"

मी तुम्हाला आणखी काय सांगणार? माझ्या शब्दात इतके सामर्थ्य आहे कोठे? ते जी भाषा बोलतात ती केवळ कानांनी ऐकण्याची भाषा नव्हे, तर ती प्राणांनी ऐकण्याची भाषा. ती मानवाची अंतिम भाषा, तींच तुमच्या अंतःकरणाचा ठाव घेऊ शकेल.

परका जेव्हा आपला बनतो, तेव्हाच आपले सर्वश्रेष्ठ भाग्य उदयाला येते; आणि आपण स्वतःला जेव्हा पारखे होतो तेव्हाच आपल्यावर सर्वांत मोठी आपत्ती ओढवते. ज्यांना आम्ही जाणूनबुजून दूर लोटले व हरवून बसलो, त्यांना आज आपण आपण होऊन परत बोलवू या. साऱ्या अपराधांचे आज निर्मूलन होऊ दे; सारे अमंगल दूर नाहीसे होऊ दे. मनुष्यत्वाचा गौरव करून आज आपण माणुसकीच्या गौरवपूर्ण अधिकाराचा लाभ करून घेऊ या !

**शांतिनिकेतन**
**५ आश्विन, १३३९**

***

अनुक्रमाणिका

# व्रताचे उद्यापन

## (आक्टोबर १९३२)

उद्विग्नतेमुळे गंभीर झालेल्या वातावरणात, मनामध्ये आशा धरून आम्ही पुण्याचे दिशेने प्रस्थान ठेवले. प्रवास पडला लांबचा; मनामध्ये शंकाकुशंका येत की, ठाण्यावर पोहोचण्याचे वेळी आपल्यापुढे काय वाढून ठेवले असेल कोण जाणे ! वाटेवर मोठे स्टेशन लागले की, माझे दोघे साथीदार ताजी वर्तमानपत्रे विकत घेऊन येत; ती मी मोठ्या उत्कंठेने वाची. पण शुभ वार्ता काही कोठे नजरेसमोर येईना. डॉक्टरमंडळींच्या मते महात्माजींची प्रकृति काळजी करण्यासारखी झाली होती. शरीरात मेद व मांस फारसे बाकी न उरल्यामुळे त्यांचा व्यय यापुढे फार वेळ असाच चालू राहिल्यास परिस्थिती दुर्धर होईल; मांसपेशीचा क्षय तर सुरू झालाच आहे; त्यात अर्धांग झाला तर प्राणांवरच बेतेल. त्याबरोबर वर्तमानपत्रात असेही पण वाचले की, त्यांना आपल्या व विरुद्ध पक्षातील मंडळींबरोबर अत्यंत क्लिष्ट व वादग्रस्त प्रश्नांवर दीर्घकाळपर्यंत सूक्ष्म चर्चा करावी लागत आहे. मागासलेल्या वर्गांना हिंदुसमाजाचाच एक भाग समजून त्यांना काही विशेष हक्क देण्यासंबंधीची कबुली त्यांनी अखेर दोन्ही पक्षांकडून मिळविली होती. सर्व शारीरिक वेदना व अशक्तता यांचेवर मात करून त्यांनी ही असाध्य गोष्ट साध्य करून दाखविली होती; आणि आता केवळ विलायतेहून ही योजना मंजूर होऊन येण्यावर सारे काही अवलंबून होते. ती मंजूर न होण्याला खरोखर कोणतेच सयुक्तिक कारण पुढे करता येण्यासारखे नव्हते, कारण मुख्य प्रधानांच्या निवेदनानुसार मागासलेल्या वर्गांच्या संमतीने हिंदुसमाज जी योजना मान्य करील तिचा स्वीकार करण्यास ते बांधले गेले होते,

आशा-निराशेच्या दोन बिंदूंमध्ये आमचे मन हेलकावे खात असता सव्वीस सप्टेंबर रोजी सकाळचे प्रहरी आम्ही कल्याण स्टेशनवर येऊन पोहोचलो. तेथे श्रीमती वासंती व ऊर्मिला यांची गाठ पडली; त्या कलकत्त्याहून दुसऱ्या रेल्वेमार्गाने आमच्या आधी नुकत्याच येऊन पोहोचल्या होत्या. अधिक वेळ न गमवता आमच्या भावी यजमानीणबाईंनी पाठविलेल्या मोटरगाडीत बसून आम्ही पुण्याची वाट धरली.

डोंगरांमधून पुण्याकडे जाणारा हा रस्ता मोठा रमणीय आहे. शहराच्या वेशीवर जेव्हा पोहोचलो, तेव्हा तेथे लष्करी हालचाली सुरू होत्या– पुष्कळशा चिलखती मोटारगाड्या, यंत्रसज्ज तोफा व रस्तोरस्ती चाललेल्या सैन्याच्या कवायती दृष्टीस पडल्या. अखेरशेवटी शेठ विठ्ठलदास ठाकरसी यांच्या प्रसादतुल्य बंगल्याजवळ आमची गाडी उभी राहिली.. त्यांच्या विधवा पत्नींनी सौम्य हास्य करून आमचे स्वागत केले व त्या आम्हाला वर घेऊन गेल्या; जाताना पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस उभ्या असलेल्या त्यांच्या विद्यालयातील मुलींनी गीतमाल्यादिकांनी आमचा सत्कारकेला.

घरी प्रवेश करतानाच सभोवतीच्या गंभीर व विषण्णतेने भरलेल्या वातावरणाची कल्पना आली होती. सगळ्यांचे चेहेर चिंताक्रान्त दिसत होते. विचारपूस करताच आम्हाला कळले की, महात्माजींची अवस्था संकटमय झाली होती. विलायतेहून तोपर्यंत काहीच खबर आली नव्हती; तेव्हा मीही एक जरूरीची तार मुख्य प्रधानांच्या नावे रवाना करून दिली.

पण त्या तारेची खरी जरूर उरलेली नव्हती; कारण त्यानंतर लगेच आमच्या कानावर अफवा येऊ लागल्या की, विलायतेहून मंजुरी आली आहे. ही अफवा खरी की खोटी याचा उलगडा मात्र झाला त्यानंतर बऱ्याच तासांनी.

आज होता महात्माजींचा मौनाचा दिवस. एक वाजल्यानंतर ते मौन सोडणार होते, त्यावेळी त्यांच्याजवळ मी असावे अशी त्यांची इच्छा होती. त्याकरिता येरवडा तुरुंगाकडे जात असताना वाटेत आमची गाडी तेथून अगदी थोड्याच अन्तरावर अडवून धरण्यात आली. मंत्री शिपायाने सांगितले की, कुठलीही गाडी पुढे सोडावयाचा हुकूम नाही. मला तर वाटले होते की आजकाल भारतवर्षांत तुरुंगाकडे जाणाऱ्या वाटा चांगल्या रुंद झाल्या आहेत ! आमच्या गाडीच्या चोहोबाजूस नाना तऱ्हेच्या लोकांची खूप गर्दी उसळली होती.

आमच्यापैकी एकजण तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडून जरूर ती परवानगी आणण्याकरिता म्हणून पुढे होत आहे, तोच श्रीयुत देवदास तरुंगाची प्रवेशपत्रिका घेऊन हजर ! नंतर आम्हाला कळले की, महात्माजींनीच त्यांना पाठविले होते; कारण त्यांना एकाएकी असे वाटू लागले की आमची गाडी पोलिसांनी कोठे तरी अडवून धरली असली पाहिजे ! अर्थात यासंबंधी त्यांना पूर्वी काहीच माहीत नव्हते हे सांगणे न लगे.

लोखंडी दरवाजे एकामागून एक खोलले गेले व पुन्हा आमच्या पाठीमागे बंद झाले. आमच्या नजरेसमोर मस्त बड्या तटाच्या भिंती, त्यांच्यामध्ये बंदिस्त केलेले आकाश, एक सरळ आंखलेला खडीचा रस्ता आणि दोन-चार झाडे अशी दिसत होती.

माझ्या आयुष्यात दोन गोष्टींचा अनुभव मला फार उशीराने मिळाला. विश्वविद्यालयाचे गेट ओलांडून आत प्रवेश करण्याचा प्रसंग अगदी नुकताच मजवर आला होता. त्याप्रमाणे तुरुंगाच्या आवारात घेऊन पोहोचण्याची संधीही थोड्या मुष्किलीने का होईना—मला अखेरीस आज मिळाली !

डाव्या बाजूकडच्या पायऱ्या चढून दरवाजातून आत गेल्यावर चहूबाजूनी भिंती असलेल्या एका अंगणात आम्ही प्रवेश केला. अलग अलग अशा खोल्यांच्या दोन रांगा होत्या; त्यांच्या मधल्या अंगणात एका लहानशा आम्रवृक्षाच्या दाट सावलीत महात्माजी खाटेवर पहुडले होते.

महात्माजीनी दोन्ही हातांनी मला जवळ ओढून घेतले व बराच वेळ छातीशी धरून ठेवून म्हटले "किती आनंद झाला मला आज !"

शुभवार्तेच्या लाटेवर बसून आल्याप्रमाणेच जणू काही माझे येणे झाले, याबद्दल मी त्यांच्याजवळ माझ्या भाग्याची प्रशंसा केली. सुमारे दीड वाजला असेल त्यावेळी. विलायतेतून आलेली खबर भारतवर्षात सगळीकडे पसरली होती. याचवेळी विधिमंडळाचे सभासदही सिमल्यामध्ये बसून या राजकीय निर्णयाची उघडपणे चर्चा करीत होते असे मागाहून कळले. वृत्तपत्राच्या बातमीदारांनाही ही गोष्ट माहीत होती. मात्र ज्यांच्या जीवनाचा ओघ क्षणाक्षणाला आटत जाऊन मृत्यूच्या सीमेला भिडूं पहात होता, त्यांच्यावरील प्राणसंकट टाळण्याची घाई कोणालाच नव्हतीसे दिसले ! मला राहून राहून त्या लांबच लांब 'लाल फिती'च्या कुटिल निर्घृणतेचे आश्चर्य

अनुक्रमाणिका

वाटत होते. सव्वाचार वाजेपर्यंत आमची उत्कंठा क्षणोक्षणी वाढत होती; नंतर ऐकले की, सकाळी दहा वाजावयाच्या सुमारालाच बातमी पुण्यात येऊन दाखल झाली होती!

चहूबाजूस मित्रवर्ग जमा झाला होता. महादेव वल्लभभाई, राजगोपालाचारी, राजेंद्रप्रसाद – हे आल्याचे पाहिले. सौ. कस्तुरबा आणि सरोजिनीदेवीही दिसल्या; जवाहरलालांच्या पत्नी कमलादेवीही आल्या होत्या.

महात्माजींची मूळचीच रोड असलेली शरीरयष्टी आता अगदी कमालीची कृश झाली होती. खोल गेलेला आवाज जवळजवळ ऐकू येईनासा झाला होता. पोटातील आम्ल सारखे वाढत असल्यामुळे मधूनमधून सोड्याचे पाणी तोंडात घालण्यात येत होते. डॉक्टरांनी तर अगदी हात टेकले होते.

इतके झाले तरी महात्माजींचे मानसिक सामर्थ्य यत्किंचितही कमी झाले नव्हते. विचारांचा ओघ सारखा चालू असून व्यक्तिगत चैतन्यात खंड पडला नव्हता. हे प्रायोपवेशन सुरु करण्याचे पूर्वीपासूनही किती गहन विचार व वादग्रस्त प्रश्नांची चर्चा करण्यात त्यांचे मन नेहमी गुंतून पडलेले असे. समुद्रापलीकडील राजकारणी लोकांबरोबर पत्रव्यवहार करीत असताना त्यांच्या मनावर सारखे कठोर आघात व प्रत्याघात होत असत. उपासांच्या मुदतीतसुद्धा वेगवेगळे पक्ष आपापल्या मागण्या त्यांच्यापुढे जोरजोराने मांडून तसल्या अवस्थेतही त्यांच्याबद्दल फारशी सहानुभूती दाखवीत नव्हते, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. तथापि, त्यांच्या मनाला थकवा आल्याचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते; त्यांच्या विचारांच्या स्वभावशुद्ध व प्रकाशमय प्रवाहात गढूळपणा कधीच निर्माण झाला नाही. शरीराचे कृच्छ्साधन चालू असताना त्यामधून दिसणारी त्यांच्या आत्म्याच्या अजिंक्य कर्मसाधनेची मूर्ति पाहून कोणालाही विस्मय वाटल्यावाचून राहिला नसता. देहाने क्षीण झालेल्या या पुरुषाच्या अंगात केवढी प्रचंड अध्यात्मशक्ति वास करीत आहे याची कल्पना त्यांना प्रत्यक्ष जवळून पाहिल्याशिवाय येणे कठीण होते.

मृत्यूच्या वेदीवर पहुलेल्या या महान् प्राणपुरुषाचा संदेश आज भारतवर्षाच्या कोट्यवधी जीवांना जाऊन पोहोचला आहे. दीर्घ अंतर, लाकूड-विटा-दगड अथवा प्रतिकूल राजकारण यापैकी कशानेच त्याला अटकाव होऊ शकला नाही. अनेक शतकांच्या जडत्वाचे बंधन आज त्यांच्यासमोर धुळीला मिळाले आहे.

महादेवभाई म्हणाले की, माझ्या वाटेकडे महात्माजी सारखे डोळे लावून बसले होते; अर्थात मी हजर राहिल्याने राजकीय प्रश्न सोडविण्यास त्यांना काही मदत झाली असती इतकी माझी त्या विषयात गती नाही; तथापि, माझ्या येण्याने त्यांना काहीसे समाधान मिळू शकले, यातच मला धन्यता वाटते.

सर्वांनी त्यांच्याभोवती गर्दी केली तर त्यांना अधिकच कष्ट होतील असे वाटून आम्ही एका बाजूस जाऊन बसलो; केव्हा खबर येऊन पोहोचते याची पुष्कळ वेळ वाट पाहात बसलो होतो. दोन प्रहरचे ऊन विटांच्या भिंतीवर उंच कमानीसारखे पडले होते. इतस्ततः शुभ्र खादी घातलेले चार दोन स्त्रीपुरुष हलक्या आवाजात चर्चा करताना दिसत होते.

अनुक्रमाणिका

विशेष डोळ्यात भरण्यासारखी गोष्ट म्हणजे तुरुंगाच्या आवारातील ही माणसे. कोणाच्याही वागणुकीत या सवडीचा गैरफायदा करून घेण्याची प्रवृत्ती दिसून येत नव्हती. चारित्र्याचे बळ हे नेहमीच दुसऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करते; तुरुंगातील अधिकाऱ्यांनाही त्यांच्यावर पूर्व विश्वास टाकून त्यांना अगदी स्वतंत्रपणे आपापसात मिसळण्याची मुभा त्यामुळेच देता आली. महात्माजींच्या अंगीकृत वचनाविरुद्ध जाऊन कोणत्याही संधीचा दुरुपयोग त्यांनी केला नाही. आत्मसंयमनाची दृढता व स्थैर्य ही त्यांच्या अंगी पूर्णपणे बाणली असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्यांच्याकडे पाहताच कोणालाही वाटावे की, भारतवर्षाकरिता स्वराज्यसाधन करण्याला जर कोणी योग्य साधक सतील तर ते हेच !

अखेरीस, आले एकदाचे तुरुंगावरचे बडे अधिकारी हातात एक सरकारी मोहोर केलेला लखोटा घेऊन; त्यांच्याही चेहऱ्यावरती स्मित झळकत होते. सावकाश व गंभीरपणाने महात्माजी पत्र वाचू लागले. मी सरोजिनीदेवींना म्हटले की, या वेळी सर्वांनी चहूबाजूस चार पावले दूर सरकलेले बरे. महात्माजींनी वाचन संपल्यावर मित्रमंडळींना जवळ बोलाविले. 'पत्रासंबंधी तुम्ही प्रथम चर्चा करून पाहा; मग ते माझ्या वतीने आंबेडकरांना वाचावयास देणे जरूर आहे, कारण त्यांचे अनुमोदन त्याला मिळाले तरच मी निश्चिंत होईन' असे त्यांनी बजावल्याचे कळले.

एका बाजूस होऊन उभ्याउभ्या पत्र मित्रमंडळींनी वाचले, मलाही वाचावयास दिले. मुत्सद्देगिरीने रचलेला व फार सावधगिरीने लिहिलेला तो लेख चांगला काळजीपूर्वक वाचणेच जरूर होते. एकूण बोध असा झाला की, महात्माजींच्या अभिप्रायाविरुद्ध असे त्यात काही नाही. पत्राचा सारांश महात्माजींना विशद करून सांगण्याचे काम पंडित हृदयनाथ कुंझरूंवर सोपविण्यात आले, त्यांनी निःसंदिग्धपणे केलेले स्पष्टीकरण ऐकून महात्माजींच्याही मनात काही संशय उरला नाही— प्रायोपवेशनाच्या व्रताची सांगता झाली !

महात्माजींची खाट भिंतीच्या आड सावलीत घेण्यात आली— त्यांच्या चोहो बाजूंस तुरुंगातल्या घोंगड्या पसरून आम्ही सर्वजण त्यावर बसलो. लिंबाचा रस सौ. कमला नेहरूंनी काढून ठेवला. सरकारी लखोटा घेऊन आलेले मुख्य अधिकारी—इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स— तेथेच होते; त्यांनी विनंति केली की, सौ. कस्तुरबांनीच आपल्या हाताने तो रस महात्माजींना द्यावा. महादेवभाई मला म्हणाले, "जीवन जखन शुकाये जाय करुणाधाराय एषो" हे गीतांजलीतील गाणे महात्माजींना फार आवडते. त्याची चाल तर मी विसरूनच गेलो होतो, पण मग आयत्या वेळी जसे सुचले तसे गावे लागले. पण्डित श्यामशास्त्रींनी वेदपठन केले. त्यानंतर महात्माजींनी सौ. कस्तुरबांच्या हातून लिंबाचा रस घेऊन त्याचे सावकाशपणाने प्राशन केले. अखेरीस साबरमती आश्रमातील मंडळींनी सर्वांच्या समवेत 'वैष्णव जन तो' हे गाणे म्हटले; फळे व मिठाई वाटण्यात आली, ती आम्ही सर्वांनी ग्रहण केली.

हा सारा महोत्सवाचा सोहळा तुरुंगाच्या आवारात चालला होता, ही गोष्ट मात्र अभूतपूर्व अशी होती. प्राणाहुतीच्या यज्ञाला प्रारंभ झाला तुरुंगात आणि त्याच्या साफल्यानेही मूर्त स्वरूप धारण केले त्याच ठिकाणी. ही जी अकस्मात अवतरलेली मधूरमीलनाची मनोहर मूर्ति, हीच खरी 'यज्ञसंभवा' म्हटली पाहिजे.

अनुक्रमाणिका

त्या रात्री पंडित कुंझरू व पुण्यात या निमित्ताने जमलेली मोठमोठी पुढारी मंडळी माझ्याकडे येऊन आग्रह करू लागली की, दुसरे दिवशी महात्माजींच्या वाढदिवसानिमित्त जी सभा होणार होती तिचे अध्यक्षस्थान मी स्वीकारिले पाहिजे; पंडित मालवीयही मुंबईहून येऊन हजर राहणार होते. अखेर मालवीयजींनाच अध्यक्ष करून मी त्यावेळी फक्त चारदोन लिहून आणलेले शब्द वाचून दाखवावे असे ठरले. प्रकृतीच्या अशक्तपणाला न जुमानता, अशा मंगलप्रसंगी बोलावलेल्या त्या प्रचंड सभेला हजर राहण्याचे कबूल करण्यावाचून मला गत्यंतरच नव्हते.

संध्याकाळी शिवाजीमंदिराच्या विस्तीर्ण उघड्या पटांगणात एक विराट सभा भरली— आत प्रवेश मिळण्याची मारामार. मला वाटू लागले की, अभिमन्यूप्रमाणे या चक्रव्यूहात एकदाचा प्रवेश झाला खरा, पण आता यातून बाहेर कसे पडावयाचे ! मालवीयजींनी आपल्या शुद्ध हिंदीत प्रास्ताविक भाषण करून अस्पृश्यता ही हिंदुधर्मशास्त्राच्या विचारांशी कशी विसंगत आहे याचे सुंदर विवेचन केले. त्यांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुष्कळ संस्कृत श्लोक पाठ म्हणून दाखविले. माझ्या बारीक आवाजामुळे एवढ्या मोठ्या जनसमुदायाला माझे म्हणणे ऐकविता येणे मला असाध्यच होते; म्हणून प्रथम मी तोंडी चार शब्द सांगितल्यावर माझे लिहून आणलेले व्याख्यान वाचून दाखविण्याची जबाबदारी पंडितजींचे पुत्र गोंविद मालवीय यांनी आपल्या अंगावर घेतली. त्यांनी त्या संधिप्रकाशात पूर्वी एकदाही न वाचता ते लिखाण एकदम इतक्या अस्खलितपणे व स्पष्ट आवाजात घडाघड वाचून दाखविले की ते ऐकून मी चकितच झालो.

माझा तो संपूर्ण लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेला आपण पहिलाच असेल. मी सभेला येण्याच्या आधीच थोडावेळ तुरुंगात जाऊन त्याची एक हस्तलिखित प्रत महात्माजींच्या हाती देऊन आलो होतो.

मोतीलाल नेहरूंच्या पत्नींनी आपल्या बंधुभगिनींना उद्देशून एक छोटेसे भाषण केले, त्यात आपल्या समाजात संपूर्ण समता प्रस्थापित करण्याचे जे व्रत आपण अंगीकारिले आहे त्यात थोडाही खंड पडू न देण्याविषयी त्यांनी उपदेश केला. श्रीयुत राजगोपालाचारी, राजेंद्र प्रसाद वगैरे प्रमुख पुढाऱ्यांनी व्यथित अंतःकरणाने आपल्या देशबांधवांना आपल्या समाजावरील कलंक धुवून काढण्याविषयी आर्जवाने सांगितले. सभेस हजर असलेल्या विराट जनसमुदायाने हात वरती करून अस्पृश्यतेचे निवारण करण्याची प्रतिज्ञा घेतली. त्या दिवशीचा संदेश सर्वांच्या अंतःकरणाला जाऊन भिडला, याविषयी शंका उरली नाही. अगदी परवापर्यंत, सहस्रावधि लोकांनी अशा तऱ्हेचा दृढसंकल्प करण्याचे नुस्ते मनात आणणेही शक्य झाले नव्हते.

माझे काम आता संपले होते. दुसरे दिवशी सकाळी बराच वेळ महात्माजींच्या सान्निध्यात काढला आणि त्यावेळी त्यांच्या व मालवीयजींच्याबरोबर निरनिराळ्या विषयांवर बराच वेळ चर्चा झाली. या एकाच दिवसात महात्माजींची शक्ति अपेक्षेबाहेर वाढली होती; त्यांच्या आवाजात अधिक स्थैर्य आले होते; रक्तदाब जवळजवळ योग्य प्रमाणावर आला होता. भेटीस येणाऱ्या पाहुण्यांचा तर रीघ लागली होती. प्रत्येकजण येऊन आपला आनंद प्रदर्शित करी व नमस्कार करून चालू लागे. ते सर्वांच्या बरोबर हसून गप्पागोष्टी करीत. लहान मुले फुले घेऊन भेटायला आली म्हणजे तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा होई. मित्रमंडळीबरोबर देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासंबंधी नाना प्रकारची चर्चा चाले. त्यांना आता मुख्य काळजी हिंदुमुसलमानांच्या ऐक्यासंबंधी लागली होती.

अनुक्रमाणिका

आज जे महात्माजींचे जीवन एवढ्या अफाट भूमिकेवरून व इतक्या उज्ज्वल स्वरूपात आल्या दृष्टीसमोर अवतरले आहे, त्यात सर्व मानवसृष्टीच्या अंतःकरणांतील महामानवाचा साक्षात्कार घडवून देणारी प्रेरणा आहे. हीच प्रेरणा भारतवर्षांत सर्व सफल होवो.

मुक्तिसाधनेचा खरा मार्ग मानवांच्या ऐक्यसाधनेत आहे. आमचे राजकीय पारतंत्र्य हे आमच्या समाजातील हजारो भेदभावांवरच पुष्ट झाले आहे.

अवजड रूढींची सारी बंधने तोडून टाकूनच मानवी संस्कृतीला ऐक्याच्या मार्गावर अग्रेसर व्हावे लागेल— आणि तो दिवस आज उगवला आहे.

**शांतिनिकेतन**

***

अनुक्रमाणिका

# महात्मा गांधी
(२ आक्टोबर १९३७)

भारतवर्षाच्या नकाशाकडे पाहिले असता हा देश एखाद्या अभंग मूर्तीप्रमाणे भासतो. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सर्व प्रांतातून आणि उत्तरेच्या हिमालय पर्वतापासून तो दक्षिणेकडील कन्याकुमारीपर्यंत जी एक अंखड संपूर्णता या भूमीत वास करीत आहे, तिची मूर्ती आपल्या अंतःकरणावर ठसावी. अशी इच्छा अगदी प्राचीन काळापासून आपल्या लोकांच्या मनात वसत असल्याचे दिसून येते. महाभारताबद्दल तर आपल्याला असे स्पष्टपणे म्हणता येईल की, देशाच्या परंपरेत निरनिराळ्या प्रसंगी उद्‌भवलेले व ठिकठिकाणी विखुरलेले असे जे विचार एक विवक्षित समयी आढळून आले, ते सर्व एकत्रित करून मोठ्या जागरूकपणे त्यांची सुसंगती लावण्याचा एक मोठा प्रयत्य या ग्रंथाच्या द्वारे करण्यात आला.

भारतवर्षाच्या अखंड भौगोलिक स्वरूपाची मनोमय साक्ष पटवून घेण्याची अशीच आणखी एक पद्धती आमच्यामध्ये प्रचलित होती ती म्हणजे तीर्थयात्रा. पूर्व-टोकापासून पश्चिम-टोकापर्यंत आणि हिमाचलापासून महासागरापर्यंत पसरलेली ही सारी भूमी एखाद्या पवित्र पिठाप्रमाणे कल्पून त्याठिकाणी निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांची स्थापना निरनिराळ्या जागी करण्यात आलेली असल्यामुळे, अखंड भारताला भक्तीच्या एकतानतेत एकाच अध्यात्मिक रज्जूने बांधून ठेवणारे असे एक साधनच जणू काही येथे अनायासे निर्माण होऊन राहिल्यासारखे झाले आहे.

भारतवर्ष हा एवढा मोठा देश की केवळ, कल्पनाशक्तीच्या जोरावर त्यांचे संपूर्णपणे आकलन करणे हे प्राचीनकाळी तरी अशक्यच होते. हल्ली जसे 'सर्व्हे' करून, नकाशे काढून आणि भूगोलवर्णने समग्र लिहून भारतवर्षाची कल्पना आणून देणे सोपे आहे, तसे पूर्वीच्या काळी नव्हते. पण का दृष्टीने ते फायद्याचेच होते; कारण सुलभरीत्या साध्य होणारी गोष्ट मनोभूमीत खोलवर पाळेमुळे धरू शकत नाही. म्हणून अत्यंत कष्ट सोसून भरतखंडाचे तीर्थपर्यटन केल्याने जे ज्ञान पूर्वीच्या काळी प्राप्त होत असे ते सहजासहजी न पुसून जाण्याइतके खोल व पक्के रुजलेले असे यात नवल नाही.

महाभारताच्या मध्यभागी अवतीर्ण झालेल्या गीतेने हेच समन्वयाचे प्राचीन तत्त्व उघड करून सांगितले आहे. कुरुक्षेत्राच्या केन्द्रस्थानी सुरू झालेली ही दर्शनिक तत्त्वज्ञानाची चर्चा काव्यमीमांसेच्या दृष्टीने अप्रस्तुत ठरणे शक्य आहे; किंबहुना मूळ महाभारतात हा भाग कोणी तरी नंतर घुसडून दिला असेही म्हणणे शक्य आहे. पण नंतरच्या काळात ज्या महाभागांनी हा भाग त्या जागी आणून बसविला असेल त्यांना एवढे माहीत असले पाहिजे की, या प्रदीर्घ काव्याच्या परिसीमेत भारतीय मनोभूमिकेच्या मध्यबिंदूवर अशा तऱ्हेच्या तात्त्विक प्रस्तावाची आवश्यकता निश्चितपणे होती. सगळ्या भारतवर्षाचे अंतर्बाह्य स्वरूप आकलन करण्याचा हा प्रयत्न धर्माचरणांतही अंतर्भूत झालेला होता; म्हणून आमच्या देशातील धार्मिक आचारात मोडणारे महाभारताचे पाठान्तर हे केवळ आध्यात्मिक दृष्टीनेच केले जात असे, असे नव्हे, तर आपल्या देशाचे यथार्थ ज्ञान सर्वांना प्राप्त व्हावे असाही एक उद्देश त्यामागे असे. याशिवाय अनेक यात्रेकरू देशभर हिंडून क्रमाक्रमाने निरनिराळ्या

स्थळांचा प्रत्यक्ष परिचय करून घेत अत्यंत आत्मीयतेने या देशाचे अखंड मनावर बिंबवून घेण्याचा प्रयत्न करीत असत.

ही झाली पुरातन काळाची गोष्ट. आज येथे पूर्वीची सारी परिस्थिती पालटलेली दिसते; देशातील माणसे आपापल्या प्रदेशातील कोनाकोपऱ्यातून दाटी करून आपापल्या जागांना जणूकाही चिकटून राहिल्याप्रमाणे आढळतात. संस्कारांच्या आणि रुढीच्या जाळ्यात गुरफटून पडल्यासारखे आज सर्वजण झाले आहेत. त्याचे उलट महाभारताच्या विराट क्षेत्रात एकतऱ्हेचे स्वातंत्र्याचे वारे खेळत असल्याचे आपल्याला दिसते. या महाकाव्याच्या विस्तीर्ण पटांगणात मनोविश्लेषणाच्या किती तऱ्हा तऱ्हा आढळतात ! ज्याला आपण सर्वसाधारणपणे निंद्य व वर्ज्य समजतो त्यालाही महाभारतात स्थान मिळालेले आढळेल. तथापि, आपल्या मनाची तितकी तयारी झाली असेल, तर हे सारे प्रमाद व दोष डोळ्यांआड करून, त्यांच्या पलिकडून ऐकू येणारा महाभारताचा संदेश समजून घेणे काही आपल्याला अशक्य नाही. महाभारताने जी एक उदात्त शिकवण दिलेली आहे ती निषेधात्मक नाही तर विधायक स्वरूपाची आहे; तिच्यामध्ये एक प्रकारची व्यावहारिक दृष्टी आहे. या ठिकाणी सारे मोठमोठे वीरपुरुष आपापल्या मोठेपणाच्या वैभवात मोठ्या दिमाखाने वावरताना दिसतात; त्यांच्यामध्येही दोष आहेत, वैगुण्य आहेत; पण हे सारे दोष आणि वैगुण्ये पचनी पाडूनच त्यांनी मोठेपण प्राप्त करून घेतलेला आहे. मानवी स्वभावाच्या यथार्थ स्वरूपाचा सूक्ष्म विचार करणारी ही जी शिकवण महाभारताने आम्हाला दिलेली आहे ती खरोखरीच असामान्य महत्त्वाची आहे.

पाश्चात्य संस्कृतीशी आपला संबंध आला तेव्हापासून आम्हाला ज्यांची पूर्वी तोंडओळखसुद्धा नव्हती, असे काही नवेच प्रश्न आपल्यापुढे उभे राहिले. कारण, प्राचीन भारतवर्षात आपल्याला असे आढळते की, भिन्न स्वभाव व भिन्न कर्म यांचे आधारावर समाजाची निरनिराळ्या वर्गांत विभागणी केलेली होती; व त्याबरोबरच अशा तऱ्हेने पडलेल्या विभागांचे परस्परांशी ऐक्य नांदावे असा प्रयत्नही सारखा चालू असे. अशा परिस्थितीत एकाएकी पश्चिम दिशेकडील महाद्वाराचा भेद करून म्लेच्छ शत्रू आत आला. पूर्वी एकेकाळी आर्य लोकांनी याच मार्गाने येऊन पंजाबातील पाच नद्यांच्या तीरावर वसाहती केल्या होत्या आणि त्यानंतर त्यांनी विन्ध्य पर्वत ओलांडून हळूहळू सारे भारतवर्ष व्यापून टाकीले होतो; त्याकाळी भारतवर्ष हे गांधार वगैरे लगतच्या प्रदेशासकट एकाच सामुदायिक संस्कृतीने बांधले गेलेले असल्यामुळे परकीयांचा आघात त्यावर होऊ शकला नाही. पण त्यानंतर जे हे आक्रमण झाले, ते करणारे लोक होते विदेशी, भिन्न संस्कृतीचे. हे जेव्हा आले तेव्हा आपल्याला कळून आले की, आपण त्या वेळपर्यंत केवळ एकत्र राहत होतो इतकेच; आमचे ऐक्य असे कधीच झालेले नव्हते. म्हणूनच त्यानंतरचे काळात म्लेच्छ आक्रमणांनी जिकडे तिकडे प्रलय करून सोडला. तेव्हापासून आपण दुःख व अपमानाच्या ग्लानीत काळ कंठीत आलो आहो. या परकीय आक्रमणाची संधी साधून कोणी एकमेकांविरुद्ध लावालावी सुरू केली आणि आपापले सामर्थ्य वाढविण्याच्या उद्योगाला लागले, तर कोणी आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता तुटलेल्या दुव्याप्रमाणे अलग अलग झालेल्या प्रदेशामधून परकीयांना अटकाव करण्याचा चंग बांधला. कोणत्याच मार्गाने यश हाती लागेना; तसे म्हटले तर राजपुतान्यात, महाराष्ट्रात, बंगाल्यात अनेक दिवसपर्यंत युद्धाचा वणवा शांत झालेला नव्हता. आणि या सगळ्या अपयशाच्या बुडाशी कारण एकच. ते हे की, देश जितका महान् तितके महान् ऐक्य त्याला कधीच लाभले नाही, अनेक संकटांशी टक्कर देऊन आम्हाला अखेर हे अनुभवाचे ज्ञान प्राप्त झाले, पण ते कित्येक शतकानंतर.

अनुक्रमाणिका

आमच्यामधील या ऐक्याच्या अभावामुळे तर परकीय आक्रमकांचा मार्ग मोकळा आणि सोपा झाला. या जवळच्या शत्रूंचे मागोमाग आणखी दूरदेशचे परकीय शत्रुंचे आपल्या व्यापारी जहाजांतून समुद्र ओलांडून धडपड करीत येथे येऊन दाखल झाले. पोर्तुगीज आले, डच आले, फ्रेंच आले आणि इंग्रजही आले. सगळ्यांनी येऊन जोरजोराने धडका मारण्यास सुरुवात केली आणि त्यांना लवकरच कळून चुकले की; येथे दुर्लभ्य अशी कोणतीच आडकाठी नाही. आम्ही आमची होती नव्हती ती सारी पुंजी बाहेर काढली; आमच्या विद्वत्तेला ओहोटी लागली; आणि आमच्या अक्कलहुषारीचे दिवाळे वाजले. बाह्य दारिद्र्याचा परिणाम अंतःकरणालासुद्धा दरिद्री बनवण्यात होतो म्हणतात तो असा.

अशा या विपत्काळी आमच्यामधील साधुसंतांच्या मनात जे विचार आले ते असे की, भारतवर्षाच्या स्वातंत्र्यासाठी जागृती निर्माण करण्याचा मार्ग म्हणजे पारमार्थिक ध्येय डोळ्यांपुढे ठेवून एखाद्या आध्यात्मिक स्वरूपाच्या चळवळीची प्रस्थापना करणे एवढाच होय. आणि तेव्हापासून आमचे सारे चित्त लागले पारमार्थिक पुण्य संपादनाकडे. जेथे मूर्तिमंत दैन्य वावरत होते आणि शिक्षणाचा अभाव होता, तेथपर्यंत आमच्या भौतिक संपत्तीचा ओघ पोहोचूच शकला नाही, पारमार्थिक पुण्य गाठीशी बांधण्याची हाव धरून जे काही ऐहिक भांडवल आम्ही खर्च करीत असू ते सारे महंत व पंडे यांच्या अहंकाराने तुडुंब भरलेल्या उदरात गडप व्हायचे. यापासून भरतखंडाचे हित तर झाले नाहीच, उलट ऱ्हास मात्र झाला.

आमच्या या विशाल भारताच्या विराट जनसमाजात अशा एका पंथाचे लोक आहेत की, जे जपतप व ध्यानधारणा साधण्याकरिता आपल्या संसाराला दारिद्र्य आणि दुःख यांच्या हवाली करून, माणसातून उठून निघून जातात. अशा तऱ्हेच्या या औदासीन्याला वाहिलेल्या व मोक्षाच्या पाठीमागे धावणाऱ्या असंख्य लोकांना अन्न कोण पुरवितो म्हणाल तर या लोकांच्या मते मोहात गुरफटून संसारावर जी लुब्ध झालेली माणसे असतात तीच. एकदा एका गावी अशाच एका साधुबुवांशी माझी गाठ पडली असताना मी त्यांना विचारले, ‘या गावात इतके दुराचारी, दुःखीकष्टी आणि व्याधिग्रस्त लोक आहेत, त्यांच्या उद्धाराकरिता आपण काहीच कसे करीत नाही ?’ माझा हा प्रश्न ऐकून त्यांना मोठे आश्चर्य वाटल्यासारखे दिसले, व रागही पण आला. ते म्हणाले, ‘काय म्हणता ? संसाराला भुललेल्या या लोकांची चिन्ता आम्ही वहावी ? अहो, साधु आहे मी ! निर्भेळ आनंदाचा अनुभव घेण्यासाठी तर मी तो तुमचा संसार सोडून दिला; आणि आता पुन्हा त्यातच पडावे म्हणता ? ही वाक्ये बोलणारांना व त्यांच्यासारख्याच इतर साऱ्या उदासवाण्या व संसाराकडे पाठ फिरवून बसलेल्या लोकांना एकदा बोलावून असे हडसूनखडसून विचारावेसे वाटते की, त्यांच्या त्या तुळतुळीत व सतेज अंगक्रांतीचे पोषण करणारे लोक होते तरी कोण ? पापी आणि तिरस्करणीय म्हणून ज्यांची हे हेटाळणी करीत आले, त्या संसारी लोकांनीच त्यांना जेवू घातले ना ? सारखे परलोकाकडे डोळे लावून बसल्यामुळे आपल्या सामर्थ्याचा अशा रीतीने केवढा अपव्यय होत आला आहे हे सांगावे तितके थोडेच आहे. शतकानुशतके भरतखंडाचा हा शक्तिपात चालूच आहे; आणि याबद्दल जी शिक्षा व्हावयाची तीही पण इहलोकींच्या विधात्याने आम्हाला दिलेलीच आहे. सेवा करून, त्याग करून, इहलोकींच्या संसाराला आम्ही उपयोगी पडावे म्हणून ताकीद देऊन परमेश्वराने आमची या जगात पाठवणी केली. त्याची आज्ञा जर आम्ही मानली नाही तर शिक्षा ही भोगायलाच हवी !

अनुक्रमाणिका

अलीकडे युरोपखंडात स्वातंत्र्याची प्रतिष्ठापना करण्यासाठी चळवळी सुरू झाल्या आहेत. इटली देश हा एके काळी परकीयांच्या तावडीत सापडून अपमानाचे जिणे जगत होता; पण नंतर त्या देशातील त्यागी, वीरपुरुष मॅझिनी व गॅरिबॉल्डी यांनी आपल्या देशाला गुलामगिरीच्या बेडीतून मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून दिले. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्येही या स्वातंत्र्यरक्षणाचे पायी किती यातना, किती प्रयास, किती संग्राम झाले हे आपल्याला माहीत आहे. माणसाला माणुसकीचे अधिकार प्राप्त करून देण्याकरिता पाश्चिमात्य देशातून कितीतरी लोकांनी स्वतःचे बलिदान केले आहे ! माणसांमध्ये भेदभाव निर्माण करून एकमेकांचा जो अपमान केला जातो, त्याच्याविरुद्ध पाश्चात्य देशातून आजही बंड चालू आहे. त्या लोकांच्या मते सर्वसाधारण समाजांतील प्रत्येक व्यक्तीला माणुसकीचा सारखा अधिकार असल्यामुळे पाहिजेत. त्या देशाताली कायदे श्रीमंत-दरिद्री किंवा ब्राह्मण-शूद्र असे भेदभाव जाणीत नाहीत. आपापसात ऐक्या करून स्वातंत्र्याची प्रतिष्ठापना कशी करता येते याचे शिक्षण आम्हाला पाश्चात्यांच्या इतिहासापासून मिळाले. सगळ्या भारतवासीयांना आपल्या देशाचे राज्य आपणच चालविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, ही जी महत्त्वाकांक्षा तीसुद्धा आम्हाला पाश्चात्यांच्या सहवासामुळेच प्राप्त झाली. इतके दिवसपर्यंत आपण आपले गाव व शेजारपाजार यांच्या छोट्याशा परिसरात, कोठे तरी इवल्याशा जागेत कार्य करीत व विचार करीत बसत असू. आपल्या गावात एखादे तळे किंवा देऊळ बांधून काढले की जन्माचे सार्थक झाले असे समजून, याच गावाला आपण मातृभूमि अथवा जन्मभूमि म्हणत असू. साऱ्या भरतखंडाचा मातृभूमि म्हणून स्वीकार करण्याइतका अवसरच आपणाला मिळाला नाही. प्रांतिक अभिमानाला बळी पडून स्वतःच्या दुर्बळ आणि पराभूत अवस्थेत आपण खितपत पडलो होतो. अशावेळी रानडे, सुरेन्द्रनाथ, गोखले वगैरे श्रेष्ठ पुरुष साधारण जनसमाजाच्या उत्कर्षासाठी पुढे आले. त्यांनी प्रारंभ केलेल्या साधनेला आपल्या प्रबळ शक्तीने, द्रुतगतीने व आश्चर्यकारक रीतीने सिद्धीच्या मार्गावर आणून सोडणारा जो महात्मा या देशात जन्माला आला त्याच्या चरित्राचे स्मरण करण्याकरिता आपण आज येथे जमलो आहोत– त्याचे नाव महात्मा गांधी.

अनेकांना असा एक प्रश्न विचारण्याचा मोह होणे शक्य आहे की, महात्माजी हेच आद्य नेते आहेत असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय ? यांच्यापूर्वी काय काँग्रेसमध्ये कोणी कार्यच केलेले नाही ? – अर्थात कार्य केलेले आहे ही गोष्ट खरीच आहे. पण अशा कार्यकर्त्यांच्या नावाचा उच्चार होताच आपल्या चटकन् ध्यानात येईल की, त्यांचे साहस यांच्यापुढे कितीतरी फिक्के, त्यांचा आवाज कितीतरी कोता ! पूर्वीच्या त्या युगात काँग्रेसवादी लोक कधीकधी अर्जविनंत्यांची टोपली सरकारी अधिकाऱ्यांकडे घेऊन जात असत. फार तर रागाने डोळे लाल झाल्याचे ढोंग कधीतरी करीत असत. त्यांची अशी समजूत झाली असावी की केव्हा प्रखर झोंबणारे तर केव्हा मृदु असे वाग्बाण सोडून आपण मॅझिनी गॅरिबॉल्डीच्या पंक्तीला सहज जाऊन बसू शकू. या मिळमिळीत व लटोपटीच्या शौर्याकडे पाहून आज आम्हाला गौरव करण्यासारखे त्यात काही आहे असे मुळीच वाटत नाही. आज जो हा पुरुष आपणापुढे उभा आहे, तो राजकीय स्वार्थापासून संपूर्णपणे अलिप्त असा आहे. राजकारणात जी अनेक पापे व दोष भरलेले आहेत, त्यातील एक फार मोठा दोष म्हणजे स्वार्थसाधूपणा. राष्ट्रीय स्वार्थ हा किती जरी मोठ्या दर्जाचा स्वार्थ झाला, तरी स्वार्थीपणाच्या अंगचा जो स्वाभाविक गढूळपणा तो त्यात आल्याशिवाय रहातच नाही. राजकारणी (पॉलिटिशिअन्) लोकांची जणू काही एक निराळी जातच बनलेली असते. यांचा जो आदर्श त्याचा कोणत्याही मोठ्या ध्येयवादाशी कधी मेळ बसणे शक्य नसते. हे लोक वाटेल तितके खोटे बोलू शकतात आणि हे क्रूर तर इतके असतता की, स्वतःच्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या मिषाने दुसरे देश खुशाला पादाक्रान्त करण्याची हाव त्यांना आवरत नाही. पाश्चात्य देशातील लोक

एकीकडे स्वदेशाप्रीत्यार्थ प्राण खर्ची घालीत असतांना, दुसरीकडे आपल्या देशाच्या नावावर कुटिलनीतीची आराधना कशी करीत असतात, हे आपल्याला दिसतेच आहे.

पाश्चात्य देशांनी ज्या मुसळाला जन्म दिला त्याची शक्ती आजही युरोपच्या माथ्यावर आपला संचार करीत आहे. आज तेथील अवस्था अशी दिसते की, आजचा युरोपीय समाजाचा उत्कर्ष उद्यापर्यंत तरी टिकतो की नाही याची शंका वाटू लागली आहे. ज्याला ते देशाभिमान (पेट्रियटिझम) म्हणून समजतात, तोच त्यांचा पेट्रियटिझम् त्यांचा अखेर घात करणारा आहे. मात्र त्यांच्या विनाशकाळी ते आमच्यासारखे निर्जीव मरण पत्करणार नाहीत तर प्रचंड ज्वाला निर्माण करून त्यांच्या भीषण प्रलयात ते स्वतःची आहुती देतील.

आमच्यामध्येही या खोटेपणाचा फैलाव झालेला आहे. आपल्या राजकारणी (पॉलिटिशिअन) जातीतल्या लोकांनी गटबाजीचे विष जिकडेतिकडे पसरवायला सुरुवात केली आहे आणि असल्या राजकारणातून बाहेर पडलेले हे विष आता आपल्या विद्यार्थी-विद्यार्थिनीमध्येही पसरत चालले आहे. ‘पॉलिटिशिअन’ हे पडले आमचे ‘कार्यकर्ते’.त्यांच्या मते, कोणतेही कार्य पार पाडावयाचे म्हणजे काही तरी छक्केपंजे केल्याशिवाय भागतच नाही ! पण असली ही बनवाबनवी विधिघटनेनुसार केव्हा तरी उघडकीला आल्याशिवाय राहील काय ? या पॉलिटिशिअनांच्या मुत्सद्देगिरीची आणि चातुर्याची फार तर एखादे वेळी वाहवा करू शकू आम्ही, पण त्यांची भक्ती करणे आम्हाला शक्य होणार नाही ! आम्ही भक्ती करू शकतो केवळ महात्माजींची; कारण त्यांच्याकडून सत्यसाधनेचा अवलंब केला गेला आहे. असत्याच्या संगतीत राहूनसुद्धा त्यांनी सत्याच्या सार्वभौम नीतितत्त्वाची कास सोडलेली नाही. भरतखंडाच्या या युगातील साधनेच्या इतिहासात हा एक मोठा भाग्याचा प्रसंग आहे ! हा असा एकच पुरुष आम्हाला दिसतो की, ज्याने कोणत्याही परिस्थितीत सत्याचा अपमान केला नाही– मग त्या वेळी तसे करणे सोईचे असो वा नसो. त्यांनी घालून दिलेले उदाहरण म्हणजे आमच्यापुढे एक मोठा आदर्श आहे. स्वराज्य आणि स्वातंत्र्य मिळविण्याचा आतापर्यंतचा जगाचा इतिहास रक्ताने माखलेला आहे, लुटालूट आणि दरोडेखोरी यांनी कलंकित झालेला आहे. पण परस्परांची हिंसा न करता, हत्याकांडाचा अवलंब न करताही स्वातंत्र्य संपादन करण्याचा मार्ग महात्माजींनी आम्हास दाखविला आहे. देशाच्या नावाखाली अनेकांनी लूटमार केली असली, आणि शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर दरोडेखोरी आरंभिली असली तरी स्वदेशाच्या नावावर मिळवलेले हे त्यांचे वैभव– हा अहंकार किती दिवस टिकणार ?

आमच्यामध्ये असे फारच थोडे लोक आहेत की, जे हिंसावृत्तीचा त्याग करून निर्विकार मनाने विचार करू शकतात. हिंसा प्रवृत्तीला अजिबात फाटा देऊनसुद्धा आपण जय मिळवू शकतो या गोष्टीवर आमची श्रद्धा आहे कुठे ? पण त्याबरोबरच महात्माजी जर कोणी लढवय्ये वीरपुरुष असते तर आपण आजच्याप्रमाणे त्यांचे पुण्यस्मरण करीत बसलो असतो असे मात्र नव्हे; कारण शूर लढवय्ये पुरुष व बलाढ्य सेनापती या पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत किती तरी जन्माला येऊन गेले आहेत !

मानवजातींमधील युद्ध हे जरी धर्मयुद्ध किंवा नैतिक स्वरूपाचे युद्ध म्हणून मानले गेले असले तरी, या धर्मयुद्धातही निर्दयतेचा अंगीकार केल्यावाचून चालत नाही हे आम्हाला गीतेत आणि महाभारतातही ठिकठिकाणी दृष्टोत्पत्तीस येते. आता त्यामध्ये शारीरिक शक्तीला स्थान आहे किंवा कसे यासंबंधीच्या शास्त्रात आम्हाला या ठिकाणी शिरण्याचे कारण नाही. परंतु त्याचे उलट हा जो एक नीतिधर्म की, "आम्ही मरू पण

मारणार नाही; आणि याच मार्गाने विजय संपादन करू" हा मात्र आम्हाला एखाद्या महावाक्याप्रमाणे वाटल्यावाचून राहावत नाही. किंबहुना ही संदेशवाणी आहे ! याला केवळ चातुर्य म्हणून समजता यावयाचे नाही. किंवा केवळ कार्यसिद्धी व्हावी म्हणून दिलेला हा व्यावहारिक सल्लाही पण नव्हे. असल्या प्रकारचे धर्मयुद्ध हे बाह्य जग जिंकण्याकरता नसते, तर युद्धात हार खाल्ल्यानंतरही परत विजयश्री संपादन करण्याकरिता असते. अधर्मयुद्धात मरण येणे म्हणजे खरोखरीच मरणे. धर्मयुद्धात मात्र मेल्यावरही काही बाकी शिल्लक उरते; ती म्हणजे पराजयापलीकडील जय, आणि मृत्यूच्या पलीकडील अमृतत्व ! ज्यांनी या तत्त्वाचा आपल्या जीवनात साक्षात्कार करून घेऊन त्याचा पूर्ण अंगिकार केला, त्याचे म्हणणे आम्हाला मान्य केल्यावाचून गत्यंतरच नाही!

या तत्त्वज्ञानाच्या मुळाशी एक उपदेश संप्रदाय आहे. युरोप खंडातील स्वतंत्र जनतेला आरंभी आरंभी जरी अनेक गोड फळे चाखावयास मिळाली असली व पुष्कळ वैभव प्राप्त झाले असले तरी आज आपल्याला त्यांच्या स्वातंत्र्याचे अवगुण व त्यांच्या स्वदेशाभिमानाची विषारी फळेही डोळ्यांपुढे दिसत आहेत. कारण या पाश्चात्य देशांनी येशू ख्रिस्ताची शिकवण केवळ तोंडापुरतीच ग्रहण केलेली आहे. ख्रिस्ती धर्माने मनुष्य प्रेमाचे केवढे मोठे उदाहरण आपल्या डोळ्यापुढे ठेवले आहे; ईश्वराने मानवरूप धारण करून आपल्या मनुष्य देहाने जगात जितके म्हणून पाप व दुःख आहे त्या सर्वांचा अंगीकार करून अखिल मानव जातीचा उद्धार केला आहे — आणि तेसुद्धा परलोकी नव्हे तर या इहलोकातच! गरीबाला वस्त्रदान व भुकेल्याला अन्नदान करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे अशी ग्वाही इतक्या स्पष्टपणे दिलेली ख्रिस्तीधर्मावाचून अन्यत्र कोठेही आढळत नाही.

मानवजातीच्या न्याय्य हक्कांची पायमल्ली होऊ नये म्हणून जन्मभर झगडणाऱ्या एका मोठ्या ख्रिस्ती साधकाबरोबरच महात्माजींचा परिचयच झालेला होता आणि सुदैवाने याच ऋषितुल्य पुरुषाकडून युरोपखंडात राहणाऱ्या टॉलस्टॉयकडून त्यांना ख्रिस्ती धर्मात सांगितलेल्या अहिंसा मार्गाचे यथार्थ दर्शन घडविले गेले. यात विशेष भाग्याची गोष्ट हीच की, हा अहिंसेचा संदेश अशा एका व्यक्तीकडून त्यांना मिळाला की जिने या जगाच्या संसाराचा अनेक परीने अनुभव घेऊन हे अहिंसेचे तत्त्व प्रत्यक्ष आचरणात आणून दाखविलेले होते; नशिबाने मिशनरी अथवा धंदेवाईक प्रचारकांच्या साच्यातील मनुष्य प्रेमाविषयीची पोपटपंची ऐकण्याचे मात्र त्यांना कधी प्रयोजन पडले नाही!

ख्रिस्ताच्या शिकवणुकीची ही एक मोठी देणगी आम्हाला मिळण्याची आतापर्यंत बाकीच राहिली होती. अशीच दुसरी एक मोठी देणगी आम्हाला पूर्वी मुसलमानांकडून मध्ययुगीन काळात मिळालेली होती. त्यावेळी दादू, कबीर, रज्जब वगैरे साधुसंतांनी असा निर्वाळा दिला होता की, निर्मळ व निर्मुक्त असे जे तत्त्व, जे आत्मस्वरूपाचे श्रेष्ठ भांडार, ते देवळांची दारे बंद करून विशिष्ट अधिकारी लोकांचे उपयोगासाठी पहाऱ्यात कोंडून ठेवावयाचे नसते, ती सरसकट सर्व मानव समाजाची संपत्ती आहे. युगानुयुगे ही गोष्ट घडत आली आहे की, जे महापुरुष म्हणून जन्माला येतात ते साऱ्या पृथ्वीतील अशा तऱ्हेच्या देणग्या स्वतःच्या माहात्म्य शक्तीने आत्मसात् करून घेतात, आणि त्या आत्मसात् करताना त्यांचे साक्षात् स्वरूप ते प्रकट करून दाखवितात. आपल्या माहात्म्यानेच पृथु राजाने पूर्वी पृथ्वीचे दोहन केले होते. तिच्या पोटातील साऱ्या रत्नांचा संग्रह करून ठेवण्यासाठी ! उच्च कोटीतील महापुरुष आजअशाच रीतीने सगळ्या धर्मांमधून, इतिहासातून आणि नीतिशास्त्रातून या पृथ्वीवरील श्रेष्ठ प्रतीच्या देणग्यांचे दोहन करीत आले आहे.

अनुक्रमाणिका

येशू ख्रिस्ताच्या उपदेशातील श्रेष्ठ नीति असे सांगते की, ‘जे नम्रपणे वागतात त्यांचाच जय होतो.’ पण इकडे आमचे ख्रिस्तधर्मानुयायी असे म्हणत बसले आहे. की, ‘निष्ठुरपणा आणि उद्धटपणा करूनच आपल्याला जय मिळविला पाहिजे !’ या दोहोंपैकी जय कोणाचा होणार आहे ते अद्याप आम्हाला नीट उमगले नसले तरी आपल्या डोळ्यांपुढे जी उदाहरणे आहेत त्यावरून, या उद्धटपणाच्या नीतीमुळे युरोपात अजून कोणते धिंडवडे माजावयाचे राहिले आहेत ते आपल्याला दिसतेच आहे. महात्माजींनी नम्रपणाची अहिंसानीति स्वीकारली आहे; आणि चारी दिशांना तिचा प्रभावही पडू लागला आहे. त्यांनी आपले सारे जीवन ज्या नीतीच्या कसोटीला लावले आहे, ती नीति मग ती आपल्याला संपूर्णपणे आचरणात आणता येतो वा न येवो आम्हाला स्वीकारलीच पाहिजे. आमच्या अंतःकरणात व आचरणामध्ये षड्रिपूचे व पापवासनेचे थैमान चाललेलेच आहे; तथापि ते चालू असेल तरी पवित्र तपाचरणाची दीक्षा आम्हाला सत्यव्रत महात्माजींच्यापासून ग्रहण केली पाहिजे !

आजचा हा दिवस संस्मरणीय होऊन राहील; कारण आज साऱ्या भरतखंडात राष्ट्रीय स्वातंत्र्याची दीक्षा आणि सत्याचरणाचे व्रत यांचे सर्वसाधारण जनतेच्या हृदयात ऐक्य घडून आलेले आहे !

**शांतिनिकेतन**
**बंगाली वर्ष १६ आश्विन १३४४**

***

अनुक्रमाणिका

# गांधीमहाराज

१

गांधींचे शिष्य आम्ही जरि कुणिहि असूं वा धनी वा दरिद्री,
एके ठायीं अम्हां जें मिळवित सकलां तत्त्व तें ऐक्यकारी—
मारूनीयां गरीबां कधिंहि नच भरूं पोट आम्ही, नमूं ना,
श्रीमंतांच्या पुढें वा, मुख कधिं अमुचें काळवंडें भयें ना ॥

२

धावोनी पाठिं लागे वळवित मुठि हा उंच कोणी वरिष्ठ
बोलूं हांसोनिया त्या, फिरवित जरि ये लाठि तो धष्टपुष्ट—
"बाळांची झोंप मोडे खचितचि तव हे पाहुनी नेत्र लाल,
आम्हां ठावें परी ना भय, म्हणुनि कसें तें कुमा दाविशील ?" ॥

३

साध्या शब्दांत बोलूं सरळपणिं जसें स्वच्छ वाटे मनाला,
ना दावूं आवडे जी चतुर कुटिलता राज्यशास्त्री-जनाला,
खेंचायाला तुरुंगीं मुरड तरि कशापायिं ती कायद्याला ?—
काराद्वारीं तसा तो सहज पकडुनी थेट नेतो आम्हांला ॥

४

जथ्यांजथ्यांतुनी हे विसरुनि घर जे चालले येरवाड्या, —
पूर्वी जी मानहानी घडलि नि पडल्या ज्यामुळे हाति बेड्या,
त्यांची ही शापमुक्ती; गळत मग धुळी श्रृंखला—साज त्यांचा
जै आपोआप, लागे सुभग बघ कपाळी टिळा गांधीजींचा! ॥

| | | | |
|---|---|---|---|
| उदयन, शान्तिनिकेतन, | } | | **रवीन्द्रनाथ ठाकूर.** |
| १३ डिसेंबर १९४०. | | | |

* * *

अनुक्रमाणिका

# परिशिष्ट

## ▪ १ ▪
## (पत्रकाराशी मुलाखत)
## (१९२१)

"महात्मा गांधींच्या विषयी आपल्याला काय वाटते?"

"महात्मा गांधींच्या विषयी मला काय वाटते ?" माझ्या प्रश्नाचा पुनरुच्चार करून कविवर्य आवेशाने म्हणाले, "गांधीजींविषयी माझे मत फारच चांगले आहे, यात शंका कसली ? ते एक महापुरुष महात्मा असून भारतवर्षांतील लक्षावधि जनतेवर त्यांचा विलक्षण प्रभाव पडलेला आहे."

"त्यांच्या या यशाचे खरे रहस्य कशात आहे असे आपल्याला वाटते ?"

"गांधीजींच्या यशाचे रहस्य त्यांच्या स्वयंस्फूर्त अशा आध्यात्मिक शक्तीत व त्यांच्या अविश्रान्त स्वार्थ त्यागात आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्ये पुष्कळजण स्वार्थी हेतूने त्याग करताना आढळतात; अशा प्रकारचा त्याग म्हणजे एखाद्या फायदेशीर धंद्यात गुंतविलेल्या भांडवलाप्रमाणेच असतो. पण गांधीजींची तऱ्हा मात्र अगदी वेगळी. त्यांचे औदार्य केवळ अद्वितीय आहे. त्यांच्या स्वतःच्या जीवनाला स्वार्थत्यागाशिवाय दुसरे नावच देता येणार नाही; ते मूर्तिमंत त्याग आहेत. त्यांना सत्तेचा, उच्च पदवीचा, संपत्तीचा, मोठ्या नावाचा किंवा ख्यातीचा—कशाचाही लोभ नाही. तुम्ही त्यांना आज भरतखंडाच्या सिंहासनावर बसवू लागला तरी ते त्यावर बसण्याचे नाकारतील, इतकेच नव्हे तर त्यात जडविलेली रत्ने विकून टाकून आलेले पैसे गरीबांना दान करतील. अमेरिकेजवळ असलेला सारा पैसा त्यांना आज द्यायला काढला तर ते तो स्वतःकरता म्हणून स्वीकारणार नाहीतच; स्वीकारलाच तर त्याचा विनियोग मनुष्यजातीच्या उन्नतीकरता एखादे थोर कार्य पार पाडण्याकडे होईल. त्यांचा आत्मा सदासर्वकाळ दुसऱ्यांना दान देण्याकरता मात्र तळमळत असतो, परत आपल्याला काही मिळावे ही अपेक्षाही कधी असत नाही— साध्या आभारप्रदर्शनाची सुद्धा नाही. यात अतिशयोक्ति मुळीच नाही, कारण ते बोलपूरला येऊन काही दिवस आमच्या आश्रमात राहिले होते तेव्हापासून मी त्यांना पूर्णपणे ओळखतो. आणि या त्यांच्या त्यागशक्तीला प्रचंड अशा निर्भयपणाची जोड मिळाल्यामुळे ती अधिकच दुर्दम्य वाटते. सम्राट व महाराजे, बंदुका व संगिनी, बंदिवास व छळणूक, अपमान व अत्याचार

अनुक्रमाणिका

यांच्यापुढेच काय, पण प्रत्यक्ष मृत्युपुढेही गांधीजींच्या आत्मिक बळाने कधी हार खाल्ली नाही. त्यांच्या आत्म्याला जणू काही मुक्ती मिळालेली आहे. माझा आज कोणी गळा दाबू लागले, तर मी मदतीकरता मोठ्याने ओरडेन; पण गांधीजींना कोणी तसे करू लागले, तर माझी खात्री आहे, ते हूं की चू सुद्धा करणार नाहीत. गळा दाबणाऱ्याकडे पाहून ते फार तर हसतील, आणि मरावेच लागले तर हसतमुख मरण पत्करतील. त्यांचे जीवन लहान मुलांच्याप्रमाणे निर्व्याज आहे. सत्याची कास ते कालत्रयीही सोडणार नाहीत; त्यांचे मनुष्यप्रेम सक्रिय आणि आक्रमक आहे. ज्याला आपण ख्रिस्ती चैतन्य म्हणतो ते त्यांच्यात आढळून येते. जसजसा मला त्यांचा अधिक परिचय होत आहेत तसतसे ते मला अधिकच आवडू लागले आहेत. जगाच्या भावी घडवणुकीत महत्त्वाचा भाग घेण्याकरताच हा महापुरुष जन्माला आला आहे, हे काही मी सांगितले पाहिजे असे नाही."

"अशा महापुरुषाची ओळख जगाला अधिक चांगल्या रीतीने व्हावयास हवी. मग आपण त्यांची ओळख का करून देत नाही? आपल्याला तर आता जागतिक स्थान प्राप्त झालेले आहे." मी विचारले.

"मी, आणि त्यांची ओळख जगाला करून देणार?— त्यांच्या प्रकाशमय आत्मशक्तीपुढे मी म्हणजे केवळ कःपदार्थ! आणि खऱ्या महापुरुषाला काही कोणी मोठे बनवावे लागत नाही. ते स्वतःच्या प्रभावाने मोठेच असतात; मात्र इतर जगाची तयारी झाली म्हणजे ते आपल्या मोठेपणाच्या सामर्थ्यामुळे आपोआपच प्रसिद्धीस येतात. वेळ आली म्हणजे गांधीजी सर्वांना माहीत होतीलच. कारण जगाला आज त्यांची आणि त्यांच्या प्रेमाच्या, स्वातंत्र्याच्या व बंधुभावनेच्या संदेशाची गजर आहे. पौर्वात्य देशांमधील आध्यात्मिक प्रवृत्तीचे गांधीजी हे एक उत्कृष्ट प्रतीक आहेत;— कारण अत्यंत परिणामकारक रीतीने ते आज हेच सिद्ध करून देत आहेत की, मनुष्यप्राण्याचा मूळ पिंड हा आध्यात्मिक स्वरूपाचा असून, नैतिक व आध्यात्मिक स्वरूपाच्या साम्राज्यांतच त्याची सर्वांगीण उन्नती होऊ शकते, आणि द्वेष व दारूगोळ्याचा धूर यांनी भरलेल्या वातावरणात तो मनाने व शरीराने निश्चतपणे नाश पावतो.

***

■ २ ■

## (नव्या युगातील धर्मयुद्ध)
## (१९३०)

नीतिशास्त्राला परलोकीच्या राज्यात हद्दपार करून आणि त्याचा उपयोग इहलोकात करण्याला मज्जाव करून मनुष्याप्राण्याने आजपर्यंत राजकारणात किंवा रोजच्या व्यवहारात कोणत्या तरी उच्च ध्येयवादाची जरूरी आहे असे फारसे मानलेले दिसत नाही. त्यामुळे केवळ व्यक्तीव्यक्तीमध्ये मतभेद उत्पन्न झाले असताना जरी हिंसेला उत्तेजन मिळत नाही, किंबहुना तिच्याबद्दल शिक्षा होते, तरी राष्ट्राराष्ट्रामधील भांडणात मात्र जंगली वागणुकीचा कोणी निषेध करीत नाही— इतकेच नव्हे तर उलट तिचा उदोउदो केला जातो. गौतम बुद्ध किंवा येशू ख्रिस्त यांच्यासारखे श्रेष्ठ पुरुष जगाच्या आरंभापासून आजपर्यंत अहिंसेच्या तत्त्वाचेच समर्थन करीत आले आहेत; त्यांनी आपल्या शत्रुवर प्रेम करून जुलमी सत्ताधाऱ्यांविरुद्ध शांततेचा

अनुक्रमाणिका

लढा दिला आहे; पण त्यांनी आमच्यावर सोपविलेली ही जबाबदारी आपण काही अजून अंगावर घेतलेली नाही.

या जगात संग्राम हा आवश्यक नाही असे कोण म्हणेल ? आपल्याला पदोपदी भेडसावणाऱ्या पापांविरुद्ध आपण झगडले पाहिजे— चिकाटीने शेवटपर्यंत झगडले पाहिजे; कारण असत्याची गय केली, तर आपण त्याच्या अस्तित्वाचा हक्क मान्य केल्याप्रमाणे होते. पण मानवी राज्यात हा झगडा नैतिक पायावर आधारलेला असणे आवश्यक आहे; त्याला धर्मयुद्धाचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे— म्हणजे अशा प्रसंगी भेकडपणाच्या हिंस्रवृत्तीविरुद्ध आपण आपले आध्यात्मिक सैन्यबल उभे केले पाहिजे. महात्मा गांधी हे याच महान ध्येयाचे प्रतिनिधी असून केवळ वैयक्तिक व्यवहारातच नव्हे तर राष्ट्राराष्ट्रांत ज्या ठिकाणी संघर्ष निर्माण होतो त्या ठिकाणीही आपण आपले सर्वोत्कृष्ट बळ निर्भयपणे खर्ची घातले पाहिजे. अशा तऱ्हेची हाक त्यांनी जनतेला दिली आहे.

जंगली अवस्थेत असताना मनुष्याने आपली भूक शमविण्याकरता आपण कोणत्या तऱ्हेचे अन्न खावे यासंबंधी काहीही मर्यादा आखल्या नव्हत्या; नरमाससुद्धा वर्ज्य नव्हते, पण समाजात उत्क्रान्तीबरोबर हळूहळू ते भक्षण करणे ही गोष्ट अशक्य कोटीतील होऊन बसली. याच तऱ्हेने अशीही एक वेळ येण्याची आपण वाट पाहू शकतो, की जेव्हा हिंसेचा उपयोग कोणत्याही सबबीवर केला तरी तो अन्याय ठरेल, मग त्याचे त्याचे परिणाम कोणतेही का भोगावे लागेनात ! कारण युद्धात मिळविलेला विजय हाही माणुसकीच्या दृष्टीने भयंकर पराजयाप्रमाणे असू शकतो; आणि किती झाले तरी अध्यात्मिक बळाचे मोल देऊन मिळविलेल्या आधिभौतिक लाभाला काहीच किंमत नसते. दुष्कृत्याने जय मिळवून स्वतःच्या आत्म्याचा विक्रय करण्यापेक्षा आपण सर्वस्वाला मुकलेले काय वाईट ?

महात्मा गांधीना आपण मानतो एवढ्याचसाठी की, त्यांनी या ध्येयाचे वाण राजकारणाच्या क्षेत्रापर्यंत आणून पोहोचविले आहे, आणि त्यांच्या नेतृत्वाखाली भारतवर्ष दिवसेंदिवस हीच एक गोष्ट सिद्ध करून दाखवीत आहे की, मानव जेव्हा आपल्या जागृतीच्या तेजस्वी जाणिवेने सर्व दुःख व अपमान कसलाही प्रत्याघात न करता सहन करतो तेव्हा आक्रमक शक्तींना त्याचेपुढे नांगी टाकावीच लागते. या महान पुढाऱ्याने दिलेल्या स्फूर्तीमुळे भारतवर्ष आज एका नव्या युगाच्या इतिहासास प्रारंभ करीत आहे.

***

अनुक्रमाणिका

■ ३ ■

## (मानवी विभूति)
## (१ डिसेंबर १९३०)

महात्मा गांधींसारख्या एखाद्या विभूतीच्या अवताराची आपण खरोखर वाटच पहात होतो. त्यांच्यासारख्या व्यक्तीने विभूतिमत्त्व प्राप्त करून घेणे ही गोष्ट केवळ पौर्वात्य देशातच शक्य आहे. त्यांच्याजवळ शारीरिक किंवा आर्थिक यांपैकी कोणतेच बळ नाही, तरी पण सर्वतऱ्हेच्या अनियंत्रित सत्तेखाली चिरडले गेलेले लोक केवळ त्यांनी दिलेल्या स्फूर्तिमुळे आपल्या पायांवर राहू शकेल; आणि सर्व जगात अत्यंत प्रबळ अशी अध्यात्मिक शक्ति आज त्यांच्यामध्ये वास करीत आहे. त्यांच्या राजकारणातील शहाणपणामुळे नव्हे तर त्यांच्या आत्मिक सामर्थ्यामुळे लोकांची त्यांचेवर श्रद्धा बसलेली आहे. लोक ध्येयवादी बनून प्राणार्पण करावयास तयार झालेले आहेत; दुःखे सहन करण्याची पात्रता आज त्यांच्यामध्ये आलेली आहे. शतकानुशतके पायांखाली तुडविले गेलेले हे लोक आज पुढे सरसावतात, दुसऱ्यांना कोणतीही इजा होऊ न देता ते स्वतःच दुःख भोगतात, आणि अशा तऱ्हेच्या आत्मक्लेशांतून ते दुसऱ्यांवर विजय मिळवितात– ही गोष्ट अद्भुत नव्हे तर काय?

आणि कालपर्यंत आपापल्या जनानखान्यातील पडद्यांपाठीमागे वावरणाऱ्या आमच्या महिला. त्याही आज बाहेर पडून या माणसाच्या या पुढाऱ्याच्या– मागून चालू लागल्या आहेत. हा पुढारी म्हणजे काही एखादा मोठा समाज नव्हे किंवा पक्ष नव्हे; तो कोणी मोठा मुत्सद्दीही पण नाही. त्यांच्यात जर काही असेल तर ती माणुसकी हीच गोष्ट ! म्हणून तर त्याचा संदेश आमच्या नसानसांतून खोल शिरून वहात राहातो आमच्या अंतःकरणात दडून राहिलेल्या शत्रुंवर तो घाव घालीत असतो. आपले नेहमीचे राज्यतंत्र बाहेरून आयात करून बाह्य उपचारांच्या योगाने परिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असते, तर हा पुरुष आमच्या अंतस्थ मानवावर हल्ले चढवीत राहतो.

***

■ ४ ■

## महात्माजींचा वाढदिवस
## (२७ सप्टेंबर १९३२)

महात्माजींनी नुकताच ज्या मृत्यूवर विजय संपादन केला त्या मृत्यूच्या भीषण वैभवात आजचा त्यांचा वाढदिवस आपण साजरा करीत आहोत.

अनुक्रमाणिका

सामान्यपणे असे आढळते की, जेथे जन्म झाला असेल त्याच्या आसपास कोठे तरी आपापल्या जवळच्या नातेवाईकांमध्ये माणसे आपापला ठरावीक आयुष्यक्रम आमरण आचरीत राहातात. त्यांच्याही आयुष्यात दरवर्षी असा एक विशेष आनंदाचा दिवस उगवतो की, ज्या दिवशी ते आपल्या थोड्याफार नातेवाईकांच्या व मित्रमंडळींच्या प्रेमावर जन्मसिद्ध हक्क सांगू शकतात. पण ज्यांना आपण महात्मे म्हणून ओळखतो त्यांचा जन्म जीवनाच्या विशाल क्षेत्रामध्ये झालेला असल्यामुळे साऱ्या जनतेकडून व राष्ट्रांकडून त्यांचा सन्मान केला जातो; त्यांचा वाढदिवस साजरा करताना ते सदासर्वकाळ आपलेच आहेत याची जाणीव आपण करून घेत असतो, इतकेच नव्हे तर त्यांच्या द्वारा आपण आपले सर्व मानवसमाजाशी असणारे आध्यात्मिक बंधुत्व अनुभवीत असतो. ते आपल्या व्यक्तिगत अस्तित्वाचे क्षेत्र विस्तीर्ण करून त्याला साऱ्या विश्वाच्या विराट पार्श्वभूमीवर उभे करतात आणि त्याला शाश्वत स्वरूपाच्या मानवत्वाचा अर्थ प्राप्त करून देतात.

अशा तऱ्हेचा एक पुरुष आज आमच्यामध्ये जन्माला आला आहे, आणि त्यादुर्लभ गोष्ट म्हटली म्हणजे आपण स्वातंत्र्य व सत्य यांचा संदेश देणाऱ्या इतर अनेकजणांना जसे आजपर्यंत धुडकावून लावले तसे याला केले नाही, हे आज आमचे मोठेच भाग्य समजले पाहिजे. त्याने दिलेली स्फूर्ति आज सर्व देशभर, किंबहुना देशाच्या मर्यादा ओलांडून बाहेरही, वेगाने संचार करीत आहे; तिच्यामुळे आमच्या क्षुद्र वैयक्तिक लोभाच्या परिसराला ओलांडून दूर जाणारे आमच्यातील सत्यप्रेम आज जागृत झाले आहे. सेवा व आत्मसमर्पण यांच्यातच खरी मुक्ती आहे असे त्यांचे आत्मचरित्र आम्हाला सारखे बजावीत आहे.

महात्माजी हे आज आम्हाला आमच्या मातृभूमीत वसत असणाऱ्या बंधुभावनेचा मध्यवर्ती धागा हाती सांभाळणाऱ्या वडील भ्रात्याप्रमाणे आहेत, ही गोष्ट सर्व राष्ट्राने प्रांजलपणे जाहीर करण्याचा हा दिवस आहे. ती व्यक्त करीत असताना आपण अत्यंत गंभीरपणे वागून या प्रसंगाची सार्थकता नुस्त्या गर्वभावनेला बळी पडून फोल ठरवणार नाही अशी मला अशा आहे. प्रस्तुतच्या युगाचे आव्हान स्वीकारण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये येऊ द्या, आणि महात्माजींनी जी जबाबदारी आपल्या अंगावर घेतली आहे ती आपण त्यांचे हातातून काढून स्वतःवर घेऊ या.

उपनिषदात सर्वजनांच्या हृदयामध्ये सदा वावरणारा जो देव त्यालाच महात्मा म्हटले आहे. 'एष देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनना हृदये संनिविष्ट : ज्याचा सन्मान आपण आज करीत आहो त्या दैवी पुरुषाला 'महात्मा' ही पदवी देणे खरोखर योग्यच आहे, कारण हा पुरुष आपल्या संकुचित, वैयक्तिक जीवनाच्या मर्यादेत गुरफटला गेलेला नसून भारतवर्षांत आज जन्मलेल्या व पुढे जन्मणाऱ्या अगणित लोकसमूहांच्या हृदयांमध्ये त्यांचे अधिष्ठान आहे. आणि दुसऱ्यांच्या हृदयांचे आकलन करण्याचे समर्थ्य असणाऱ्या त्याच्या आत्म्याचा जो मोठेपणा त्याने आमच्या इतिहासात अभूतपूर्व अशी एक गोष्ट घडवून आणलेली आहे; ती म्हणजे आज सामान्य जनतेलासुद्धा 'भारतवर्ष ही केवळ एक भौगोलिक समस्या नसून ज्याच्यात आपल्या जीवनाचे सारसर्वस्व सामावले आहे असे ते एक जीवत सत्य आहे' या महान वस्तुस्थितीची पूर्ण जाणीव झालेली आहे....

***

अनुक्रमाणिका

▪ ५ ▪

## गांधींचे मानवी स्वरूप
## (जानेवारी १९३८)

मागे पाश्चात्य देशांतून काही महिने परिभ्रमण करून भारतवर्षात परत येतो तो मला सारा देश ताबडतोब स्वातंत्र्य मिळणार अशा अपेक्षेने खडबडून उठलेला आढळला. गांधीजींनी एका वर्षात स्वराज्य मिळवून देण्याचे वचन दिले होते– पण ते मिळविण्याचा मार्ग तर उघडउघड संकुचितपणाचा आणि बाह्य अनुष्ठानावर भर देणारा असा दिसत होता.

एवढ्या मोठ्या व्यक्तीकडून अशा तऱ्हेचे वचन उच्चारले गेले असल्यामुळे व्यावहारिक जगात सामान्यपणे हिशेबी म्हणून समजली जाणारी माणसेही आशेच्या उन्मादाने पछाडली गेली होती; आणि अशांनी माझ्याबरोबर रागावून वादही घातले, की यावेळचा प्रश्न हा केवळ तर्कटे लढविण्याचा नसून तो एक तऱ्हेचे गूढ सामर्थ्य आणि अद्‌भुत अंतर्ज्ञान बाळगणाऱ्या अशा एका आध्यात्मिक अवतारासंबंधीचा आहे ! याचा परिणाम मात्र असा झाला की, आमच्या युगानुयुगे निष्कळ ठरत आलेल्या राजकारणाला जबाबदार असणारा असा जो आमच्या स्वभावातील एक जन्मजात कमकुवतपणा, त्यालाच उत्तेजन देऊन महात्माजी आपल्या महान् ध्येयाची पूर्ति करू पहात आहेत की काय, असा संशय मनात बळावू लागला.

आपण जे तर्क बुद्धीला तुच्छ लेखण्यात धन्यता मानीत आलो आणि अंधश्रद्धेला तिच्या जागी बसवून तिलाच आध्यात्मिकतेच्या मोलाने लेखीत आलो, त्याचेच प्रायश्चित्त म्हणून आपण आज मनाने आणि निष्ठेने निष्प्रभ बनून राहिलो आहो; आपल्या लोकांमधील अंधश्रद्धेचा फायदा घेऊन वरचा डोलारा जरी तुम्हाला चटकन बांधता आला तरी पाया मात्र खचतच राहील, असे म्हणून मी त्यावेळी महात्माजींना दोष दिला. राष्ट्रीय नेता या दृष्टीने महात्माजींविषयीचे माझे मूल्यमापन हे अशातऱ्हेने सुरू झाले– आणि ते तेथेच कायमचे संपले नाही, हे मी माझे महद्‌भाग्य समजतो !

X X X

इतर महान् कर्मयोग्यांप्रमाणे गांधीजींनाही आपल्यामधील स्वयंभू निर्माणशक्तीचा योग्य व सुसंगतपणे आविष्कार करता यावा म्हणून कोणत्या तरी एका विराट साधनोपायाची आवश्यकता होती. त्यांनी समाजक्षेत्रातील अगणित खाचखळगे व कुंपणे, आणि ओसाड राजकारणातील अमर्याद निर्बुद्धता यांच्यामधून वाट काढीत सगळ्या देशाचे नेतृत्व स्वीकारून त्याला स्वातंत्र्य मिळवून देण्याची जबाबदारी जेव्हा अंगावर घेतली, तेव्हा ती घेत असतानाच त्यांनी ते साधन स्वतःकरता निर्माण करून घेतले. या त्यांच्या परिश्रमामुळे त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच संपन्न व परिपूर्ण बनले आहे आणि त्यांच्यामध्ये वसत असलेल्या विशिष्ट प्रतिभागुणांचा आविष्कार त्यातून होऊ लागला आहे. अलीकडे मी तर त्यांना एक कलावंत म्हणून ओळखू लागलो आहे– अर्थात् त्यांच्या धार्मिक मतांवरून अगर छंदांवरून मी त्यांच्याविषयी अनुमाने काढीत नाही, तर त्यांच्या मनाचे अलौकिकत्व सिद्ध करणाऱ्या त्यांच्या व्यावहारिक कृतीवरून त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न मी

अनुक्रमाणिका

करीत असतो. आणि याच एकमेव न्याय्य अशा दृष्टिकोणातून त्यांच्याकडे पाहू लागलो म्हणजे त्यांच्या मानवी प्रभावसामर्थ्याचा मला अचंबा वाटतो.

स्वतः वैराग्यसंपन्न असूनही दुसऱ्यांच्या उपभोगक्षमतेचा त्यांना तिटकारा नाही. उलट ते त्यांच्या जीवनवृक्षाला रात्रंदिवस पाणी घालण्याच्याच खटपटीत असतात. स्वतःच्या जीवनात गरिबीला महत्त्वाचे स्थान देत असतानासुद्धा जनतेच्या आर्थिक कल्याणाकरता इतक्या तत्परतेने झटणारा मनुष्य भारतवर्षात त्यांच्याशिवाय दुसरा सापडत नाही. स्वतः एखाद्या क्रांतिकारकाच्या उत्साहाने सामाजिक सुधारणा घडवून आणीत असता आपणच उद्दीप्त केलेल्या भावनांवर ते कडक बंधने घालीत राहतात. मूर्तीपूजक व मूर्तीभंजक या दोहोंचेही मिश्रण त्यांचे स्वभावात झालेले असल्यामुळे ते जुन्यापुराण्या दैवतांना धूळ माजलेल्या देव्हाऱ्यात तसेच राहू देतात, पण जुन्या तऱ्हेच्या पूजाविधीला अधिकाधिक परोपकारशीलतेचे वळण ते नकळत लावीत असतात. जातिसंस्थेवर विश्वास असल्याचे सांगूनही तिचे सर्वात बलिष्ठ असे चौकीदार जेथे बसले आहेत अशा ठिकाणावर ते आपले सर्वात तीव्र हल्ले चढवितात– पण इतके असूनही त्यांच्यापेक्षा एखाद्या कमी दर्जाच्या किंवा कमी प्रभावाच्या मनुष्याला जी लोकनिंदा सहन करावी लागली असती ती त्यांना जवळजवळ मुळीच सहन करावी लागलेली नाही.

लैंगिक जीवन हे मनुष्याच्या नैतिक प्रगतीशी विसंगत आहे असे म्हणून ते त्याचा निषेध करतात आणि "क्रॉयत्सर सोनाटा"च्या लेखकाइतकेच त्यांना त्याचे वावडेही आहे; पण टॉलस्टॉयप्रमाणे त्यांना मनुष्यजातीला मोहात पाडणाऱ्या लिंगाचा तिटकारा मात्र नाही. इतकेच नव्हे तर स्त्रियांच्याविषयी त्यांच्या मनात वसत असणारी मृदु भावना ही त्यांच्या स्वभावातील एक अत्यंत अभिजात व टिकाऊ स्वरूपाचा असा गुणविशेष आहे; आणि त्यांनी चालविलेल्या आंदोलनात त्यांच्याबरोबर अत्यंत उत्तम रीतीने व आत्मीयतेने काम करणाऱ्या अशा सहकाऱ्यांमध्ये या देशातील काही स्त्रियाही सापडतात.

दुष्कर्म करणाऱ्या माणसाचा द्वेष न करता त्याने केलेल्या दुष्कृत्याचा द्वेष केला पाहिजे अशी त्यांची शिकवण आहे. हा उपदेश आचरण्याला अशक्य कोटीतील असल्याप्रमाणे वाटतो; पण त्यांनी स्वतःच्या जीवनापुरता तरी तो शक्य तितका खरा करून दाखविला आहे. अधिकृत काँग्रेस पक्षाने विद्रोही ठरविलेल्या अशा एका मोठ्या राजकीय पुढाऱ्याला ते एकदा मुलाखत देत असताना मी तेथे हजर होतो. त्यांच्या जागी दुसरा एखादा काँग्रेस पुढारी असता तर तो अत्यंत तिरस्कारपूर्वक वागला असता पण गांधीजींची वृत्ती अगदी प्रसन्न होती व त्याला जराही कमीपणा न वाटेल अशा रीतीने ते अत्यंत सहिष्णुतेने व सहानुभूतीपूर्वक त्याचे म्हणणे ऐकून घेत होते. मी मनात म्हटले, हे खरे महापुरुष, कारण ते स्वतःच्या पक्षापेक्षाही फार मोठे, इतकेच काय, तर ते आपल्या पक्षनीतिहूनही अधिक मोठे आहेत !

म्हणून गांधीजींविषयी जी एक विशेष गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे असे मला वाटते ती अशी की, राजकारणी, संघटना करणारे, लोकनायक, नीतिसुधारक अशा निरनिराळ्या स्वरूपात ते किती जरी मोठे वाटले तरी, त्या सर्वांपेक्षा ते आपल्या मानवधर्माने अतिशय मोठे आहेत; कारण त्यांची इतर कोणतीही स्वरूपे अथवा कार्ये त्यांचे मानवंत्व मर्यादित करू शकत नाहीत. किंबहुना त्यांना या त्यांच्या मानवतेतूनच स्फूर्ति व आधार मिळत आला आहे. ते अगदी अट्टल ध्येयवादी असून सर्वलौकिक व्यवहाराला आपली आवडती

नीतिसूत्रे लागू करीत राहण्याचे त्यांना जरी वेड असले, तरी तत्त्वतः ते मनुष्यप्रेमी आहेत— कल्पनाप्रेमी नव्हे; यामुळेच तर ते आपल्या क्रान्तिकारक योजनांची अंमलबजावणी करण्याचे कामी इतके दक्ष व स्थैर्यशाली असू शकतात. एखादा सामाजिक स्वरूपाचा प्रयोग करून पाहण्याचे त्यांनी ठरविले म्हणजे प्रथम ते तो प्रयोग स्वतःवर करून घेतात; दुसऱ्याकडून त्यागाची अपेक्षा करण्यापूर्वी स्वतः त्याची किंमत देऊन पहाण्याविषयी त्यांचा कटाक्ष असतो. अनेक समाजवादी म्हणविणारे लोक स्वतःचे विशिष्ट हक्क सोडण्यापूर्वी दुसऱ्यांचे हक्क आधी हिरावून घेतले जातात की नाही याची वाट पाहत बसतात, तर गांधीजी दुसऱ्यांना स्वार्थत्यागाचा उपदेश करावयास जाण्यापूर्वी स्वतः तो आचरून दाखवितात.

भारतवर्षांत व इतर देशातूनही असे कित्येक देशभक्त सापडतील की ज्यांनी स्वदेशापायी गांधीजींच्या इतकाच स्वार्थत्याग केलेला आहे, कित्येक असेही सापडतील की ज्यांना त्यांच्याहीपेक्षा जबरदस्त शिक्षा भोगाव्या लागल्या आहेत; धार्मिक क्षेत्रात सुद्धा या देशात असे काही तपस्वी लोक आढळतील की ज्यांच्या खडतर व्रताचरणांशी तुलना करता गांधीजींचे जीवन हे कितीतरी सुखाचे वाटावे. पण ते देशभक्त म्हणजे निव्वळ देशभक्तच, यापलीकडे काही नाही; त्याचप्रमाणे ते तपस्वी म्हणजे केवळ आध्यात्मिक स्वरूपाचा व्यायाम करणारे मल्ल, स्वतःच्याच गुणांमध्ये गुरफटलेले मानव. त्यांचे उलट गांधीजी मात्र स्वतःच्या महान् सद्‌गुणांपेक्षाही महान् आहेत !

त्यांच्या नावाशी संलग्न झालेल्या सुधारणांपैकी कुठल्याच सुधारणेची मूळ कल्पना त्यांची स्वतःची नव्हती; त्यापैकी बहुतेक सगळ्या त्यांच्या पूर्वीच्या अगर समकालीन व्यक्तींनी प्रतिपादलेल्या व प्रचारलेल्या आढळतात. भारतवर्षातील ग्रामोद्धाराकरता विधायक कार्यक्रमाची जरूरी, मुलांच्या शिक्षणात हस्तव्यवसायास महत्त्वाचे स्थान देण्याची आवश्यकता, हिंदुधर्मातील अस्पृश्यतेच्या दुःस्वप्नाचा भंग करणयाची निकड या सर्व बाबतीत काँग्रेसने त्या मान्य करण्याचे आधी किती तरी दिवस मी स्वतः लिहिले आहे व प्रचार केला आहे. तरी पण ही गोष्टी कोणीही नाकबूल करू शकत नाही की, त्यांनी हे कार्यक्रम हाती घेताच त्यांच्यामध्ये जी एक स्फूर्तिदायक शक्ती निर्माण झाली तशी ती पूर्वी कधीही झालेली नव्हती; कारण यावेळी त्यांच्या पाठीशी उभी असणारी संचालक शक्ती ज्या सिद्ध पुरुषाची आहे तो आपल्या ध्येयाशी अत्यंत तन्मय झालेला असा असून त्याच्या दृष्टीपुढील सारे आदर्श त्याच्या साऱ्या जीवनाशी संपूर्णपणे निगडीत झालेले आहेत.

त्यांनी आपल्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाची उभारणी साधनांच्या शुद्धतेवर व सत्यतेवर भर देऊनच केली आहे, ही गोष्ट त्यांच्या गंभीर व दृढ स्वरूपाच्या मानवत्वाची साक्ष देते; कारण तिचा कटाक्ष असा आहे की, स्वतःच्या वैयक्तिक अथवा सामुदायिक हक्कांसाठी लढत असताना आपण आपले अधिकार अशा तऱ्हेने प्रस्थापित केले पाहिजेत की, त्यामुळे जीवसृष्टीबद्दल आदर बाळगण्याविषयीचे जे आद्य मानवी कर्तव्य त्यात अंतर पडता कामा नये. हल्ली अस्तित्वात असणारे काही विशिष्ट वर्गांचे अधिकार व हक्क हे प्रथम हिंसेच्या जोरावर मिळविले गेले होते व त्यांचे रक्षणही हिंसेनेच केले जात आहे, म्हणून त्यांचा नाश करावयाचा असल्यास तोही हिंसेनेच करावा लागेल असे म्हणणे म्हणजे केवळ एक कधीही न संपणाऱ्या चक्रापत्तीत सापडण्यासारखे आहे. कारण प्रचलित असलेल्या समाजव्यवस्थेविरुद्ध योग्य अगर काल्पनिक स्वरूपाच्या तक्रारी करणारांची सामान्यपणे वाण कधीच पडत नाही, तेव्हा अशा सर्वच लोकांना वरील तत्त्वानुसार स्वतःवर

कोणत्याही तऱ्हेची नैतिक जबाबदारी पडू शकत नसून आपण हिंसेच्या चिखलातून मार्ग काढीतच आपले ध्येय गाठणार अंसे ठासून सांगण्याचा हक्क प्राप्त होईल. कोठे ना कोठे तरी या चक्राचा भंग झाला पाहिजे. हा भंग प्रथम घडवून आणण्याचे श्रेय आपल्या देशाने प्राप्त करून घ्यावे. हीच गांधीजींची इच्छा आहे.

यात कदाचित त्यांना यश येणारही नाही. मनुष्यजातीला आपल्या पापांपासून परावृत्त करण्याच्या प्रयत्नात कदाचित ते बुद्ध-ख्रिस्तांप्रमाणे पराभूत होतील. पण भविष्यकालाकरता आपल्या जीवनाचा नमुनेदार आदर्श सर्वांपुढे ठेवून जाणारा म्हणून मात्र त्यांची स्मृति चिरंतन कालपर्यंत टिकून राहील.

***

■ ६ ■

## (थोर संत)
### (२८ फेब्रुवारी १९३९)

सामान्य माणसांच्यापेक्षा विशेष उच्च अशा मनोभूमिकेवर आरूढ होऊन विचार करू शकणारे व इतिहासाला नवे वळण लावून देणारे असे काही श्रेष्ठ पुरुष आपल्याला वेळोवेळी राजकारणाच्या क्षेत्रात उदयाला येताना दिसतात. ते ज्या शक्तींचा उपयोग करतात त्या जवळजवळ भौतिक शक्तींच्या इतक्या प्रभावी व निर्घृण असतात; आणि त्यांच्या साहाय्याने लोभ, भय, पोकळ अभिमान वगैरेसारख्या मानवी मनाला कमकुवतपणा आणणाऱ्या मनोवृत्तींचा ते गैरफायदा घेत असतात.

महात्मा गांधींनी भारतवर्षाच्या स्वातंत्र्याची चळवळ ज्यावेळी सुरु केली, त्यावेळी त्यांच्या हाती अशा तऱ्हेची एखादी शक्तिही नव्हती अथवा लोकनियंत्रण करण्याचा एखादा जबरदस्त अधिकारही नव्हता. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतून उफाळणारे तेज मात्र विलक्षण शोभायमान व संगीताने परिपूर्ण भरलेले असे होते ! इतरांवर या तेजाचा एवढा प्रचंड प्रभाव पडण्याचे कारण म्हणजे त्यांत सामावलेली स्वयंस्फूर्तीने आत्मसमर्पण करण्याची शक्ती हेच होय! याकरताच तर भारतीय जनतेला त्यांच्यामध्ये जी एक क्लिष्ट प्रश्न सहजरीतीने हाताळण्याची हातोटी दृष्टीस पडते तिचे विशेष महत्त्व वाटत नसून त्यांच्या स्वभावात जो एक निर्भेळ व निर्व्याज सत्याचा आविष्कार झालेला आहे त्याचेच खरे कौतुक वाटते. व्यावहारिक राजकारण हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र असतानाही ज्यांचे चैतन्य मानवी स्वभावाच्या चित्रविचित्र आविष्कारांना पुरून उरते आणि सांसारिक जीवांना अनंत प्रज्ञेतून उगम पावणाऱ्या प्रकाशकिरणांच्या दिशेने अभिमुख करते, अशा महात्म्यांच्या कोटीत लोक त्यांना बसवू पहातात, त्यातीलही रहस्य हेच आहे.

(शांतिनिकेन)

***

अनुक्रमाणिका

■ ७ ■

## ("विश्वभारती"— विषयक पत्र)
## (१९-९-१९४०)

प्रस्तुत पुस्तकाचे गुजराथी भाषांतर माझे स्नेही श्री. बचुभाइ शुक्ल यांनी १९४८ साली केले. त्यांनी आपल्या प्रस्तावनेत रवीन्द्रनाथ व महात्मा गांधी या दोघांमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराचा काही भाग गुजराथीत दिला आहे. हा भाग गांधी-साहित्याचे सुपरिचित अभ्यासक श्री. भाऊ धर्माधिकारी यांचे नजरेस आणून देताच माझे विनंतीवरून त्यांनी त्यांचे मराठी भाषांतर त्वरित उपलब्ध करून दिले. त्यापैकी रवीन्द्रनाथांचे "विश्वभारती"च्या स्थैर्यासंबंधीचे एक पत्र या परिशिष्टांत घालणे योग्य वाटते. पत्र खालीलप्रमाणे. (२६-१-१९८४)

प्रिय महात्माजी, उत्तरायण, १९-२-१९४०

आज सकाळी थोड्याच वेळापूर्वी तुम्ही 'विश्वभारती' केन्द्राच्या कार्यपद्धतीवर उडत उडत नजर टाकली आहेत. तिच्या गुणदोषाविषयी तुम्ही मनात काय अंदाज बांधले असतील ते मला माहीत नाही. आपल्याला माहीत आहे की, ही संस्था स्वतःच्या प्राथमिक अवस्थेत जरी राष्ट्रीय असली तरी तिचे अंतर्यामीचे रूप आन्तरराष्ट्रीय आहे; आणि तिला उपलब्ध असलेल्या सर्व साधनांनिशी ती भारतीय संस्कृतीचें अतिथ्य जगातील इतर देशांना देऊ करीत आहे.

आणीबाणीची एक वेळ आली होती, अशा समयी तुम्ही तिला कोसळून पडण्यापासून वाचविलेत, आणि तिला स्वतःच्या पायांवर उभी केलीत. या मैत्रीपूर्ण कामगिरीबद्दल आम्ही तुमचे सदैव ऋणी आहोत.

आणि आता तुम्ही शांतिनिकेतनचा निरोप घेऊन चालला आहात त्याअगोदर मी तुम्हास अंतःकरणपूर्वक एक कळकळीची विनंती करू इच्छितो; ती ही की, या संस्थेला तुम्ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून मानीत असाल, तर तिला तुम्ही आपल्या छायाछत्राखाली कायमची घेत असल्याची ग्वाही द्यावी. 'विश्वभारती' ही माझ्या जीवनाची सर्वोत्तम मत्ता वाहणारी नौकाच आहे असे तुम्ही समजा ! माझ्या देशबांधवांनी तिचे जतन करावे असा खास दावा ती करू शकेल अशी मला आशा आहे.

सप्रेम
**रवीन्द्रनाथ ठाकूर**

***

अनुक्रमाणिका